## पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी गजाआड; पोलीस कोठडी



**पुणे** : येथील स्वारगेट एसटी स्थानकात शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर झालेल्या बलात्कारानंतर फरार असलेला आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने पोलिसांनी आरोपीला गुणाट या गावातून मध्यरात्री अटक केली. यानंतर आरोपीला शुक्रवारी (दि. २८) पुणे सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी न्यायालयाने आरोपीला १२ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. दरम्यान, आरोपी दत्तात्रय गाडे याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, या प्रकरणातील सर्व गोष्टी तपासात समोर आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलणे योग्य राहील, असे म्हटले आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २२४

www.ramprahar.com

शनिवार, १ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


राष्ट्रपतींच्या हस्ते रायगडातील जाई श्रीवर्धनकरचा सत्कार/२

अलिबाग अपघातप्रकरणी एसटी बसचालकाला अटक /५

भारत-पाकिस्तान संघ यंदा पुन्हा भिडणार!/८


# मुंबईच्या धर्तीवर पनवेलमध्ये स्वयंपुनर्विकास!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा पुढाकार; पुढील महिन्यात सोसायट्यांची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात विशेषतः सिडको वसाहतींमध्ये इमारती जुन्या झाल्या आहेत. त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी अनेक बांधकाम व्यावसायिक पुढे येत आहेत, परंतु अनेकदा त्यांच्याकडून प्रकल्प लवकर पूर्ण होत नाही. सदनिकाधारकांना त्रास दिला जातो. त्याचबरोबर आवश्यक किंवा जास्त वाढीव जागा दिली जात नाही. या पार्श्वभूमीवर लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबईच्या धर्तीवर पनवेल येथेसुद्धा स्वयंपुनर्विकसित प्रकल्प राबवण्याच्या दृष्टिकोनातून पुढाकार घेतला आहे. या संदर्भात सोसायटी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

पनवेल परिसरामध्ये सिडकोने सर्वात अगोदर कळंबोली, नवीन पनवेल या वसाहती विकसित केल्या. त्यानंतर खारघर, कामोठे नोड झाले. येथे सुरुवातीला प्राधिकरणाकडून इमारती बांधण्यात आल्या. त्यानंतर खासगी व्यावसायिकांना भूखंड विक्री करण्यात आले. तेथेही बिल्डिंग उभ्या राहिल्या. त्याचबरोबर पनवेल शहरातसुद्धा इमारती बांधण्यात आल्या. दरम्यान, या घरांची स्थिती फारशी चांगली नाही. विशेषकरून कळंबोली आणि नवीन पनवेल येथील सिडको इमारती जुन्या झाल्या आहेत. ठिकठिकाणी स्लॅब कोसळण्याच्या घटना घडतात. त्याचबरोबर इमारतींना बाहेरून तडे गेले आहेत. पावसाळ्यात ठिकठिकाणी गळती लागते. परिणामी अनेक सदनिकाधारक आपला जीव मुठीत घेऊन राहतात.



**पनवेल परिसरातही पुनर्विकासाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. अशा परिस्थितीत दोन पिढ्या किंवा त्यापेक्षाही अधिक काळापासून या भागात राहणाऱ्या रहिवाशांना स्वयंपुनर्विकासाच्या माध्यमातून त्यांच्या हक्काच्या जागेत आधुनिक घरे मिळण्याची संधी निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल आणि आनंद निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात स्वयंपुनर्विकास प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. लवकरच पनवेलकरदेखील स्वयंपुनर्विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलतील याची मला पूर्ण खात्री आहे.**
**–प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल विधानसभा**

### सदनिकाधारकांना विविध फायदे

संबंधित इमारतीचा पुनर्विकास स्वतः सदनिकाधारक म्हणजेच सोसायटी करते. या सभासदांना दुप्पट किंवा त्याहून अधिक मोठ्या क्षेत्रफळाचे घर मिळू शकेल. बिल्डरला मिळणार लाभ सदनिकाधारकांना होईल. वेगवेगळ्या पायाभूत सुविधांचा विकास करता येईल. त्याचबरोबर रहिवासी आत्मनिर्भर होतील. सर्वसामान्य सदनिकाधारकांची फसवणूक होणार नाही. हा प्रकल्प सोसायटी करत असल्याने तो वेळेत पूर्ण होऊ शकतो.

या सोसायट्यांचा पुनर्विकास व्हावा, त्यांना वाढीव चटई क्षेत्र मिळावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. नवी मुंबई आणि पनवेलच्या आमदारांनी या संदर्भात सभागृहात आवाजसुद्धा उठवला. त्यानुसार राज्य सरकारने निर्णय घेतला, मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणीला बराच कालावधी लोटला.

आता सिडको वसाहतीमध्ये इमारतींच्या पुनर्विकासाचे काम सुरू आहे, पण ते बिल्डरांना देण्यात आले आहे. मुंबईमध्ये आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकसित प्रकल्पाचे उद्घाटन व गृह चाव्या प्रदान समारंभ झाला. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक सहाय्याने साकारलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला दरेकर यांनी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनाही निमंत्रित केले होते.

दरम्यान, आतापर्यंत मुंबईतील एकूण १५ सोसायट्यांचा पुनर्विकास आतापर्यंत झाला आहे, तर १६०० प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले आहेत. आता अशाच प्रकारे पनवेलमध्येही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सोसायट्यांचा पुनर्विकास होणार आहे.

### तीन वर्षांपर्यंत व्याज माफ

*बँकेचे कर्ज आणि प्रीमियम भरणे सदनिकाधारकांना कठीण होत असल्याने स्वयंपुनर्विकास प्रकल्पाकरिता तीन वर्षांपर्यंत व्याज माफ करण्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. मार्च २०२६पर्यंत येणाऱ्या सर्व प्रस्तावांना या योजनेचा लाभ देण्याचेसुद्धा त्यांनी जाहीर केले. त्यामुळे पनवेलमधील स्वयंपुनर्विकासालाही त्याचा फायदा होणार आहे. आज स्वयंपूर्ण विकासामुळे मुंबईतल्या मध्यमवर्गीयांना एक आशेचा किरण तयार झाला की त्यांच्याही जीवनामध्ये परिवर्तन होऊ शकते आणि सगळ्यात महत्त्वाचे त्यांच्यात आत्मनिर्भरता आली. हा केवळ स्वयंपूर्ण विकास नाही, तर आत्मनिर्भर विकास आहे. मुंबईच्या धर्तीवर अशा प्रकारचे प्रकल्प राबविल्यावर पनवेल परिसरातील हजारो कुटुंबीयांचे प्रशस्त घरांचे स्वप्न साकारण्यास एक प्रकारे मदत होणार आहे.*

# उरणच्या आमसभेत विविध विषयांवर चर्चा

## नागरी प्रश्न मार्गी लावा; आमदार महेश बालदी यांचे अधिकाऱ्यांना निर्देश




**उरण : वार्ताहर**

उरण पंचायत समितीची आमसभा शुक्रवारी (दि. २८) आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली जेएनपीटी मल्टिपर्पज हॉलमध्ये झाली. या आमसभेत विविध विषयांवर चर्चा झाली. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिकारीवर्गाने तत्परतेने कार्यवाही करावी, असे निर्देश आमदार महेश बालदी यांनी या वेळी दिले.

व्यासपीठावर आमदार महेश बालदी यांच्यासह तहसीलदार उद्धव कदम, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) डॉ. विशाल मेहुल, उपजिल्हाधिकारी (मेट्रो सेंटर, उरण) जनार्दन कासार, उपजिल्हाधिकारी (एमएमआरडीए) संतोष जाधव, नगर परिषद मुख्यधिकारी समीर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे विविध शासकीय, निमसरकारी तसेच विविध आस्थापनांच्या



अधिकाऱ्यांना आणि संबंधिताना आमसभेसाठी निमंत्रित करण्यात आले होते.

या आमसभेत तालुक्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने सुसज्ज रुग्णालयाची गरज, वाहतूक कोंडी, अपघात, अनधिकृत बांधकामे, बेकायदा कंटेनर यार्ड, अतिक्रमण, विजेचा लपंडाव, पाणीटंचाई, भंगारवाले, उरण बायपास रोड, रेल्वे पार्किंग रेट कमी करणे, रेल्वेगाड्यांची वेळ वाढवणे, दिव्यांगांना ग्रामपंचायतीमधून मिळणारा पाच टक्के निधी, मच्छीमारांचे नुकसान, जि.प. शाळांची दुरवस्था, हेटवणे धरण पाणीपुरवठा आदी विषयांचा समवेश होता. याशिवाय मोकाट कुत्रे व माकडांपासून होणारा त्रास, हनुमान कोळीवाडा पुनर्वसन प्रश्न, पुनाडे धरणातील गाळ व लिकेज यावर चर्चा करण्यात आली.

उरण तालुक्यात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याचा माझा प्रयत्न राहील, असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी आमसभेस संबोधित करताना दिले.

या आमसभेस न्हावाशेवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक ओवे, वाहतूक पोलीस निरीक्षक दहिफळे, भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह आदी पदाधिकारी, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### उत्तराखंडमध्ये हिमस्खलन; ५७ कामगार गाडले गेले

**बद्रीनाथ** : उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले असून उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे. हे सर्व कामगार बीआरओशी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. आयटीबीपी, बीआरओसह इतर बचाव पथकांकडून मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

### पाकिस्तानमध्ये मशिदीत आत्मघाती हल्ला; पाच जण ठार, २० जखमी

**खैबर पख्तुनख्वा** : पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतातील नौशेरा भागात एका मशिदीमध्ये शुक्रवारी (दि. २८) दुपारी नमाज पठणावेळी भीषण बॉम्बस्फोट झाला. यामध्ये किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून २० जण गंभीर जखमी झाले आहेत. सुसाईड बॉम्बरकरवी हा आत्मघाती स्फोट घडवून आणण्यात आला. रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# अलिबाग येथील समुद्रात मच्छीमार बोट जळून खाक

## १८ खलाशांना वाचवण्यात यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागच्या समुद्रात शुक्रवारी (दि. २८) पहाटे एका मच्छीमार बोटीला आग लागली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. बोटीतील १८ खलाशांना वाचविण्यात आले, पण पण बोट जळून खाक झाली असून बोटमालकाचे एक कोटी ८० लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे.

अलिबागच्या साखर गावातील एकविरा माऊली ही बोट शुक्रवारी पहाटे समुद्रात मच्छीमारीसाठी गेली होती. खोल समुद्रात या बोटीला आग लागली. बोटीला आग लागल्याचे कळताच खलाशांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला होता, मात्र त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. आग विझत नाही हे पाहताच खलाशांनी समुद्रात उड्या घेतल्या. ते इतर होडीतून किनाऱ्यावर आले. दरम्यान, तटरक्षक दलाच्या मदतीने आग विझविण्यात आली, तर सहा तासांच्या परिश्रमानंतर बोट बाहेर काढण्यात यश आले.



**या बोटीला पहाटे चारच्या सुमारास आग लागली. आमचे अधिकारी तेथे पोहचले आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज आहे. पंचनाम्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**
**–संजय पाटील, सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग**


# आरटीई अंतर्गत प्रवेश मिळण्याचा मार्ग सुकर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीला यश; पाल्य व पालकांना मोठा दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रकियेसाठी पालकांना निवासी पत्त्याच्या अडचणीला सामोरे जावे लागत होते. त्या अनुषंगाने पालकांना होणारी ही समस्या दूर झाली आहे. या संदर्भात लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांच्याकडे केलेल्या मागणीला यश आले असून विद्यार्थी व त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे पालकांकडून मंत्री दादासाहेब भुसे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहेत.

आरटीई प्रवेश प्रक्रियेत पालकांना कागदपत्रांच्या अनुषंगाने अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पत्र देत त्या संदर्भात चर्चाही केली होती. राज्यात इयत्ता पहिलीकरिता आरटीई अंतर्गत प्रवेश घेण्यासाठी १३ जानेवारी रोजी प्राथमिक


प्रशांत ठाकूर
विधानसभा सदस्य
दि. २४/०२/२०२५
प्रति,
मा. ना. श्री. दादाजी भुसे साो.,
मंत्री-शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई-३२.
विषय :- RTE अंतर्गत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या पालकांना येणाऱ्या अडचणींसंदर्भात...
आपला,
(प्रशांत ठाकूर)

शिक्षण संचालनालयाने विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करताना नवीन निकष लागू केलेले होते. त्यामुळे पूर्वी जाहीर केलेले व नव्याने लागू केलेले निकष यामध्ये तफावत आढळून आल्यामुळे पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. शिक्षण संचालनालयाने नवीन निकषामध्ये उल्लेख करताना भाडेकरार प्रवेश फॉर्म भरण्यापूर्वीचा असणे व दुय्यम निबंधक यांच्याकडील रजिस्टर भाडेकरार असणे आवश्यक आहे, असा नियम जानेवारी २०२५मध्ये जाहीर केला आणि प्रवेश प्रक्रियासुद्धा त्याच महिन्यात सुरू झाली असल्याने पालकांनी दुय्यम निबंधकाकडे रजिस्टर भाडेकरार केला तरी तो ग्राह्य मानला जाणार नव्हता.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपरोक्त बाब शालेय शिक्षणमंत्रीमंत्री दादासाहेब भुसे यांच्या निदर्शनास आणून देत प्रवेश प्रक्रियेसाठी नोटरी केलेले भाडेकरार मान्य करावे अथवा दुय्यम निबंधकाकडे नव्याने रजिस्टर केलेले भाडेकरार ग्राह्य धरावे किंवा विद्यार्थ्यांच्या पालकांकडे त्याच पत्त्यांचे आधार कार्ड, रेशनकार्ड, राष्ट्रीय बँकेचे पासबुक, वाहन परवाना, पासपोर्ट यापैकी तत्सम कागदपत्रांना परवानगी देण्याची आणि तातडीने कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाला आदेश व्हावेत, अशी आग्रही मागणी केली होती. **(पान २ वर..)**

# पनवेलमध्ये रंगली कवितांची मैफिल; श्रोते मंत्रमुग्ध

## कवी कुसुमाग्रज यांची जयंती आणि मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांची जयंती व मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'संदीप वैभव... आणि कविता' ही वैभव जोशी आणि संदीप खरे यांच्या स्वरचित कवितांची नवी मैफिल आयोजित करण्यात आली होती. या मैफिलीला रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार




प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संदीप खरे आणि वैभव जोशी यांनी आपल्या लोकप्रिय व हृदयस्पर्शी कवितांचे सादरीकरण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या काव्यप्रदर्शनाला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली. या वेळी फडके नाट्यगृह हाऊसफुल्ल झाले होते.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषेला राज्याच्या अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला. त्यामुळे १ मे हा मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा दिन म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या गौरवासाठी समर्पित आहे. **(पान २ वर..)**




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# उन्हाच्या झळा वाढणार!

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात फेब्रुवारी महिन्यातच उष्णतेच्या असह्य झळा जाणवू लागल्याने यंदाचा उन्हाळ्यात तीव्र उष्णतेला समोर जावे लागण्याची भीती असताना भारतीय हवामान विभागाने या संदर्भात महत्त्वाची माहिती दिली आहे. देशातील अधिकांश भागात मार्च ते मे दरम्यान सामान्यपेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

मार्च ते मेदरम्यान देशात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून महाराष्ट्रातदेखील यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा अधिक राहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

सध्या राज्यासह देशातील



विविध भागांत तापमानाची पातळी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ या भागांमध्ये उष्णतेचा प्रभाव अधिक तीव्र असल्याचे सांगण्यात येत आहे.

हवामान अभ्यासक कृष्णानंद होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार मार्चच्या सुरुवातीच्या दिवसात राज्यातील अंतर्गत भागात २-३ अंशांनी तापमान वाढणार आहे. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून दिवस व रात्रीच्या तापमानात असामान्य वाढ होईल, असा अंदाज आहे.

# फिनटेक, एआय स्टार्टअपला गती -मुख्यमंत्री फडणवीस

## ◆ पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रित करणार

**मुंबई : प्रतिनिधी**

फिनटेक आणि 'एआय' क्षेत्रातील स्टार्टअप्सला गती देण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करत असून देशात महाराष्ट्र राज्य स्टार्टअप आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर आहे. जेव्हा आपण ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो, तेव्हा तंत्रज्ञान हा विकासाचा मुख्य आधारस्तंभ असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




बीकेसी येथे मुंबई टेक वीक २०२५ चा शुभारंभ झाला. उद्घाटनप्रसंगी लोकमत समुहाचे सहव्यवस्थापकीय संचालक ऋषी दर्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जियो कन्वेंशन सेंटर येथे मुलाखत घेतली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा भविष्यातील रोडमॅप आणि राज्य सरकारच्या तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत एम.एम. आर.डी.ए. आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (छ्झउख) यांच्यात सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. एम.एम.आर.डी.ए.ने एन.पी.सी.आय.ला मुंबईतील बीकेसी येथे त्यांच्या जागतिक मुख्यालयाच्या उभारणीसाठी भूखंड प्रदान केला. आपले सरकार व्हॉट्सॲप चॅटबॉट संदर्भात माहिती तंत्रज्ञान विभाग आणि मेटा यांच्यामध्ये तसेच कौशल, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि टिम सोबत नॉलेज संदर्भात सामंजस्य करार झाला. त्याचबरोबर उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजक संग्रहालयाची स्थापना केली जाणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली.

मुलाखतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वॉररूममुळे प्रकल्पांच्या निर्णय प्रक्रियेला वेग मिळला आहे. पूर्वी मुंबईत एखादा प्रकल्प सुरू करण्यासाठी १८ विविध सरकारी यंत्रणांची परवानगी घ्यावी लागायची, त्यामुळे प्रकल्पांना विलंब होत असे. वॉररूमच्या माध्यमातून सर्व संबंधित अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी एकत्र आणून त्वरित निर्णय घेण्यास सुरुवात केली. यामुळे मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यासारख्या प्रकल्पांना गती मिळाली, असे.फडणवीस यांनी सांगितले. पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आगामी पाच वर्षांत महाराष्ट्र सरकार तीन मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार आहे. यात वाढवण बंदर हा प्रकल्प एकंदरीतच राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडविणारा आहे. हे बंदर सध्याच्या जे.एन.पी.टी. पेक्षा तीनपट मोठे असून, २० मीटर खोल असल्यामुळे जगातील सर्वात मोठी जहाजे येथे थांबू शकतील. भारताला जागतिक सागरी व्यापारात महत्त्वाचे स्थान मिळवून देणारा हा बंदर प्रकल्प असेल. त्याचबरोबर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व नव्या स्मार्ट सिटीच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणार आहे. हे विमानतळ पूर्ण झाल्यावर परिसरात एक नवीन व्यापारी आणि तंत्रज्ञान केंद्र विकसित केले जाणार आहे. ही नवी शहरे मुंबईच्या तुलनेत तीनपट मोठी असतील आणि उद्योगांसाठी उत्तम संधी उपलब्ध करतील. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा आणि गोदावरी नदीजोड प्रकल्प हाती घेतले जात आहेत. या प्रकल्पांमुळे हजारो शेतकऱ्यांना फायदा होईल आणि शेती उत्पादन वाढणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना संदर्भात श्री.फडणवीस म्हणाले की, जगभरात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. भविष्यात ७०% गुन्हे हे सायबर गुन्हे असतील. या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत भारतातील सर्वात आधुनिक सायबर सुरक्षा केंद्र उभारले आहे. सर्व बँका, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांना या यंत्रणेशी जोडले असल्याने आता कोणत्याही आर्थिक फसवणुकीवर तत्काळ कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २००० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्रात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गुंतवणूक कमी झाल्यामुळे अनेक आयटी कंपन्या बंगळुरू आणि हैदराबादकडे वळल्या. मात्र, अटल सेतूसारख्या प्रकल्पांमुळे नवी मुंबई आता एक नवे तंत्रज्ञान केंद्र बनत आहे. मुंबईच्या भविष्यातील विकास आराखड्यावर भाष्य करताना श्री.फडणवीस यांनी सांगितले की, आजच्या मुंबईत व्यावसायिक जागांची कमतरता असल्यामुळे नवी मुंबई, नवीन ठाणे आणि वाढवण येथे नवीन शहरे उभारली जाणार आहे. त्यामुळे उद्योगांना अधिक जागा उपलब्ध होईल आणि मुंबईवरील भार कमी होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

## राष्ट्रपतींच्या हस्ते रायगडच्या जाई श्रीवर्धनकरचा सत्कार

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील भिरा गावातील जाई विनोद श्रीवर्धनकर हिचा २७ फेब्रुवारी रोजी अहमदाबाद येथील राष्ट्रीय डिझाईन संस्थे च्या ४४व्या दीक्षांत समारंभात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शांता केशवण आणि एन केशवण एन्डोमेंट अवॉर्ड (उत्कृष्ट पदवी प्रकल्प पुरस्कार) प्राप्त झाला. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, राज्यपाल आचार्य देवव्रत आणि केंद्रीय राज्य मंत्री जितिन प्रसाद हे देखील या कार्यक्रमात उपस्थित होते.

प्रत्येक कॅलेंडर वर्षी शांता केशवण आणि एन केशवण एन्डोमेंट पुरस्कार सर्वोत्तम अंडरग्रॅज्युएट डिझायनर्सला दिले जातात - एक कम्युनिकेशन डिझाईन, एक इंडस्ट्रियल डिझाईन आणि एक टेक्सटाईल आणि अपेरेल डिझाईनमध्ये.

जाईने 'आयडिएशन, इनोवेशन आणि अंमलबजावणी' च्या अत्युत्तम पातळीचे प्रदर्शन केले. तिचा प्रक्ल्प उपक्रम ब्रँडिंग, अभ्यागतांची वाहतूक यांचे संकल्पना तयार करणे आणि समुदाय-केंद्रित स्थान तयार करणे यावर लक्ष केंद्रित करतो, तसेच म्युझियमच्या क्षेत्रात टिकाऊ पर्यटन क्रिया बिंदू जोडतो, जसे की ट्रेक्स आणि स्थानिक कथा. रॉयल एनफिल्डच्या उड्ठ उपक्रमातून ग्रीन हब स्मॉल ग्रांट्स २०२३ द्वारा समर्थित, हा प्रकल्प संरक्षणाच्या प्रयत्नांशी आणि समुदाय-आधारित पर्यटनाशी जोडलेला आहे, जो पारंपारिक ज्ञान आणि पारिस्थिति सुसंगततेला एकत्र करतो.

रायगड जिल्ह्यातील जाईने सर्व मुलीं समोर महिला सक्षमीकरण ध्येयाने एक चांगलाच आदर्श निर्माण केला आहे. त्याबद्दल तिचे कौतुक होत आहे.



## नवी मुंबई शहरात भिकाऱ्यांचा उपद्रव वाढला; नागरिक त्रस्त

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरात गेल्या काही महिन्यांपासून भिकाऱ्यांची संख्या वाढली आहे.यामध्ये लहान मुलांचा समावेश अधिक आहे. हे भिकारी शहरातील रेल्वे स्थानक परिसर, सिग्नल, मॉलच्या बाहेरील परिसर , गर्दी असलेल्या मिठाई दुकानाबाहेर मोठ्या संख्येने आढळून येतात. शिवाय कोपरखैरणे , घणसोली, वाशी, सानपाडा सीवूड्स, नेरुळ आदी ठिकाणच्या उड्डाणपुलाखाली त्यांनी आपला संसार थाटला आहे . त्यामुळे अस्वच्छता, भांडणे यातून छोटे मोठे गुन्हे घडत आहेत.



नवी मुंबईत भिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी उच्छाद मांडला आहे. रेल्वे स्थानकातील तिकीट खिडकी शेजारी तिकीट काढण्यासाठी उभ्या असणाऱ्या प्रवाशांना पैसे द्या म्हणून पिडतात. पैसे नाही दिले तर घाणेरड्या भाषेत शिव्या देखील दिल्या जातात. तसेच रस्त्याने चालत असताना दोन-चार मुले किंवा लहान मूल कडेवर घेतलेली महिला पैसे द्या म्हणून मागे लागुन वाहन चालकांना तसेच पायी चालणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास देतात. नागरिकांनी कितीही दुर्लक्ष केले किंवा झिडकारले तरी पैसे घेतल्याशिवाय पिच्छा सोडत नाहीत.


कोपरखैरणे - घणसोली उड्डाणपुलाखाली असणाऱ्या भिकाऱ्यांना काही महिन्यांपूर्वी हुसकावून लावण्यात आले होते. मात्र हुसकावून लावले की ते अन्यत्र कुठे तरी जाऊन तेच काम करतात. सध्या कोपरखैरणे रेल्वे स्थानकातील पार्किंगमध्ये पथारी टाकून आहेत.

## छत्रपती शिवाजी नाट्यमंदिरात आज आत्मशाहिरी कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

शाहीर आत्माराम पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. स्वातंत्र्याची चळवळ, संयुक्त महाराष्ट्र लढा, गोवा मुक्ती संग्राम हे लोकलढे त्यांच्या प्रेरणादायी गाण्यांनी लढले गेले. राष्ट्र, महाराष्ट्र आणि मराठी भाषा त्यांच्या पोवाड्यांचा आणि शाहिरी गीतांचा विशेष होता. त्यांनी आपल्या शाहिरीतून महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल सांगितला, तसे वर्तमान - भविष्यही सांगितले आहे. त्यांच्या ह्या ऐतिहासिक कार्याला मानवंदना देण्यासाठी ज्येष्ठ व युवा शाहीर आत्मशाहिरी हा कार्यक्रम होत आहे.

हा कार्यक्रम शनिवार, १मार्च रोजी संध्या. ७.३० वाजता छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर, दादर येथे महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने आयोजित केला आहे. संभाजीनगर येथील युवा शाहीर अजिंक्य लिंगायत आपल्या २० युवक - युवती गायक -



वादक हे या कार्यक्रमांचे विशेष आकर्षण असतील. शाहीर विवेक ताम्हणकर, लोक संगीतकार व गायक मनोहर गोलांबरे यांचा खडा आवाज कार्यक्रमात रंग भरेल. तसेच, आत्माराम पाटील यांच्या पत्नी शाहीर इंद्रायणी पाटील आणि ज्येष्ठ शाहीर मधू मोरे हे दोघे वयाच्या ८५व्या शाहिरांच्या आठवणींप्रमाणेच त्यांची गीतेही सादर करतील. विनोद सम्राट संतोष पवार हे ह्या कार्यक्रमाचे सूत्रधार आहेत.

हा ऐतिहासिक ठेवा रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने अनुभवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

## पनवेल मनपाकडून थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणीस सुरुवात

### औद्योगिक वसाहतीमधून मालमत्ता कर भरण्यास प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार महापालिकेच्यावतीने उपायुक्त स्वरूप खरगे यांनी मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरोधात अटकावणी व जप्ती मोहीम अधिक तीव्र केली आहे.




या आदेशनूसार मालमत्ता कर न भरणाऱ्या नवीन पनवेलमधील औद्योगिक वसाहतीमधील टेक्नोपेट मशिनरी, मेरिडियन कंपनी कामोठे येथील सुविधा कोल्ड स्टोरेजवरती अटकवणी कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीमधील थकीत मालमत्ता कर असणाऱ्या विविध कारखान्यांवरती व हॉटेल्सवरती अटकावणीची व जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

आतापर्यंत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील विविध कंपन्याच्या माध्यमातून एका दिवसात सुमारे अडीच कोटीहून अधिक मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात ३लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध ॲपच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड ' तयार केले आहे.

पान १ वरुन

## आरटीई अंतर्गत प्रवेश मिळण्याचा मार्ग सुकर



महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
दूरध्वनी क्र. (०२०)२६१२४५७२
(०२०)२६०५४३१८
ई-मेल- depmah2@gmail.com
www.depmah.org

जा.क्र.प्राशिसं/ड-८०१/२०२५/ [illegible]
दिनांक :- २७ -२-२०२५

प्रति,
१.विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व
२.शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई मनपा/शिक्षण निरीक्षक मुंबई उत्तर/दक्षिण/पश्चिम
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सर्व
४.प्रशासन अधिकारी मनापा/ नपा सर्व
५.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ,सर्व

विषय:-सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या RTE २५% प्रवेश प्रक्रियेसाठी निवासाचा पत्ता ग्राहय धरणेबाबत
संदर्भ-संचालनालयाचे पत्र क्र.आरटीई २५ टक्के/२०२५/८०१/१०८/दि.१३/१/२०२५

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रानुसार सन २०२५-२६ या वर्षासाठी बालकांचे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील १२(सी)(१) नुसार दुर्बल व वंचित बालकांना २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी निवासी पुरावा बालकांचे पालक ज्या क्षेत्रातील शाळा निवडत आहेत त्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या मालकीची निवासीव्यवस्था असल्यास त्या निवासी पुराव्याकरिता रेशनिंग कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, वीज देयक, टेलिफोन देयक,प्रॉपटी टॅक्स देयक, घरपट्टी,मतदान ओळखपत्र,पासपोर्ट, आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बॅंकेचे पासबुक यापैकी कोणताही एक पुरावा ग्राहय धरण्यात येईल असे नमूद आहे.

**याबाबत असे स्पष्टीकरण देण्यात येते की, बालकांचे पालक ज्या कार्यक्षेत्रातील शाळा निवडत आहेत.** त्या कार्यक्षेत्रामध्ये स्वतःच्या मालकीची निवासीव्यवस्था नसेल परंतु पालकांकडे निवासी पुरावा म्हणून तो राहत असलेल्या ठिकाणचे रेशनिंग कार्ड,ड्रायव्हींग लायसन्स, वीज देयक,टेलिफोन देयक,प्रॉपटी टॅक्स देयक, घरपट्टी,मतदान ओळखपत्र,पासपोर्ट, आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बॅंकेचे पासबुक इत्यादी त्याठिकाणचे असल्यास ते निवासी पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात यावा. तसेच पडताळणी अधिका-यास याबबत अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास पालक राहत असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन खात्री करण्यात यावी.

तरी उपरोक्त प्रमाणे निवासी पुरावा याबाबतच्या स्पष्टीकरणानुसार सर्व संबंधितांनी कार्यवाही करावी.

(शरद गोसावी)
शिक्षण संचालक(प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य,पुणे

या अनुषंगाने प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून २७ फेब्रुवारीला आदेश जारी झाले असून आता रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज बिल, टेलिफोन बिल, प्रॉपर्टी टॅक्स बिल, घरपट्टी, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक यांसारखी कागदपत्रे निवासी पुरावा म्हणून मान्य केली जाणार आहेत. या निर्णयामुळे पनवेल तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत शिक्षणाच्या हक्काचा प्रवेश मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

## पनवेलमध्ये रंगली कवितांची मैफिल; श्रोते मंत्रमुग्ध

१ मे हा मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्याचा दिवस, तर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषेच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदानाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो, ज्याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रचार, प्रसार केला जातो. या दिवसाचे महत्त्व लक्षात घेता राज्यभरात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातात. यामध्ये साहित्यिक कार्यक्रम, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असतो.

मराठी भाषेच्या संवर्धन आणि प्रचारासाठी यंदाही भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने 'संदीप वैभव...आणि कविता' हा एक लोकप्रिय मराठी काव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार झाला. यामध्ये प्रसिद्ध कवी संदीप खरे आणि वैभव जोशी यांनी आपल्या स्वरचित कवितांचे सादरीकरण करून विविध कवितांद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या वेळी उपस्थित रसिक श्रोत्यांनी वाहवा अशी दाद दिली.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, शहर चिटणीस अमित ओझे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका वृषाली वावेकर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, जितेंद्र वाघमारे, वैभव बुवा आदी उपस्थित होते.

## ११ महिन्यांमध्ये दोन लाख ३९ हजार नवीन वीजजोडण्या

**भांडुप : प्रतिनिधी**

नवीन वीजजोडण्या देण्यासाठी महावितरणच्या कल्याण आणि भांडुप परिमंडलाने वेगवान व तत्पर कार्यवाही करीत गेल्या अकरा महिन्यांमध्ये २ लाख ३९ हजार १९ नवीन वीजजोडण्या कार्यान्वित केल्या आहेत. एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान कल्याण परिमंडलात १ लाख ३५ हजार ८३९ तर भांडुप परिमंडलात १ लाख ३ हजार १८० नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्राहकसेवा गतीमान करण्यासोबतच प्रामुख्याने नवीन वीजजोडण्यांना आणखी वेग देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही ग्राहकसेवा गतिमान करण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे कल्याण व भांडुप परिमंडलामध्ये नवीन वीजजोडण्यांचा वेग वाढविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले.

अकरा महिन्यांच्या कालावधीत कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एक अंतर्गत २९ हजार ५५६, कल्याण मंडल दोन अंतर्गत ३५ हजार ४४, वसई मंडलात ४७ हजार ९६० आणि पालघर मंडल कार्यालयांतर्गत २३ हजार २७९ नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या. तर भांडुप परिमंडलातील ठाणे शहर मंडलात २७ हजार ६६२, वाशी मंडलात ४४ हजार ७१८ आणि पेण मंडल कार्यालयांतर्गत ३० हजार ८०० नवीन वीजजोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

## मराठी लोककलेचा उत्सव उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम विभागात बुधवार (दि २७ )रोजी मराठी राजभाषा गौरव दिवस मोठ्याा उत्साहात साजरा करण्यात आला.

मराठी भाषेचे जेष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला ज्ञानभाषा बनवण्यासाठी अथक परिश्रम केले त्यांच्या स्मृतीला वंदन, स्मरण व अजरामर बनवण्यासाठी त्यांचा जन्मदिवस म्हणजेच २७ फेब्रुवारी हा मराठी राजभाषा दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही हा सोहळा एक नवीन उंची गाठून आपल्या अनेक स्मृती ठेवून गेला.




राजभाषा दिनाच्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मारुती अंबुलगेकर असोसिएट प्रोफेसर चांगू काना ठाकूर महाविद्यालय, खांदा कॉलनी, नीलिमा शिंदे मुख्याध्यापिका इंग्रजी प्राथमिक विभाग, वैशाली पारधी पर्यवेक्षिका इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग व सुधीर ठाकूर उपाध्यक्ष शिक्षक पालक संघ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने व कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून झाली. प्रमुख पाहुणे अंबुलगेकर व मुख्याध्यापक चव्हाण यांच्या हस्ते ग्रंथदिंडी काढण्यात आली. भगवंत विठ्ठलाचे नामस्मरण करत, टाळ मृदुंगाच्या गजरात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी मराठमोळ्या वेशभूषेतून ग्रंथदिंडी पूर्ण शाळेच्या आवारात फिरवण्यात आली.

प्रमुख पाहुणे मारुती अंबुलगेकर आपल्या मनोगतातून मराठी भाषेचा विकास, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांचा इतिहास व विद्यार्थ्यांनी यश संपादन करण्यासाठी कोणत्या सकारात्मक बाबींचे अवलोकन करावे अशा त्रिवेणी विषयावर प्रकाश टाकला .

मायबोली मराठी आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्कारांचे बोल आहेत. जागतिकी करण्याच्या या स्पर्धेत आपण आपली भाषा विसरू नये अशी इच्छा मुख्याध्यापक चव्हाण यांनी आपले विचार मांडले

## निवडक

### वाहनाच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** चारचाकी वाहनाच्या धडकेने गंभीररित्या जखमी होवून एका पादचार्याचा मृत्यू झाल्याची घटना पळस्पे जवळील जयवंत हॉटेल समोर घडली आहे. हन्नाल अली अब्दुल लतिफ मनिहार (४४ रा.पेठ गाव) याला पळस्पे येथील गोवा हायवेवर जयवंत हॉटेल समोर गोवा-पनवेल लेनवर चार चाकी वाहनाने धडक मारली त्यात ते गंभीररित्या जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वैभव माळींनी वाचविले श्वानाचे प्राण

**पनवेल :** एका भटक्या कुत्र्याला कुणीतरी मारहाण केल्याने तो मरणासन्न अवस्थेत पडलेला होता. हे लक्षात येताच बेलापूर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार वैभव माळी यांनी तत्काळ त्याला प्राण्यांच्या डॉक्टरकडे नेले. या कुत्र्याची परिस्थिती फार गंभीर होती. डॉक्टरांनी त्याच्यावर तत्काळ उपचारास सुरुवात केली. परंतु घाव खूप गंभीर असल्याने ते भरुन घेण्यास खूप कालावधी लागणार होता. परंतु वैभव माळी यांनी डॉक्टरांस तो पुर्ण बरा होईपर्यंत उपचार करणार असल्याचे सांगितले. जवळजवळ एक महिना या उपचारासाठी लागला. हा संपूर्ण खर्च वैभव माळी यांनी केला. एक महिन्यानंतर तो कुत्रा संपूर्णपणे बरा झाला. त्याला संपूर्ण बरा झालेला पाहून वैभव माळी यांनी समाधान व्यक्त केले. खाकी वर्दीतही संवेदनशील माणूस असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे माळी आहेत. त्यांचे कौतुक होत आहे.

# मुलगा व मित्रांच्या मदतीने केला पतीचा खून

## पत्नीचा कारनामा उघड; आरोपी ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

पत्नीने १६ वर्षाच्या मुलगा व दोन मित्रांच्या मदतीने पतीचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विमानतळ सर्विस रोडवरून वहाळगावाकडे येणाऱ्या खाडीवरील पुलावर अनोळखी इसमाचा मृतदेह पोलिसांना आढळला होता. त्यानुसार उलवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून ओळख पटवण्यासाठी चौकशी सुरू केली होती.

या दरम्यान रेश्मा मोरे आणि तिचा मुलगा हे सचिन मोरे मिसिंग असल्याबाबतची तक्रार देण्यास पोलीस ठाण्यास आले होते. त्या वेळी तिला अनोळखी मयत इसमाचे फोटो दाखविल्याने तिने ते फोटो पाहून तो तिचा पती असल्याचे ओळखले.

या महिलेकडे पोलीस उपनिरीक्षक देशमुख यांनी चौकशी केली असता ती असमाधानकारक आणि संदिग्ध उत्तर देत असल्याने तिच्यावर संशय आला. त्यामुळे तिच्या मोबाईलचे सीडीआर त्यांच्या राहत्या घराचे बिल्डिंगचे सीसीटीव्ही फुटेज तसेच मृतदेहाच्या शवविच्छेदन अहवाल यावरून मृत इसमाचा नाक आणि तोंड दाबून खून झाल्याबाबत खात्री झाल्याने खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.

यानंतर पुढील तपास केला असता रेश्मा मोरे यांनी तिचा पती मानसिक आणि शारीरीक त्रास देत असल्याने त्यास घटस्फोट देण्यास सांगितले होते. परंतु पतीने घटस्फोट देण्यास नकार दिल्याने त्यांनी पतीला जिवे ठार मारण्याचे ठरविले. रेश्मा सचिन मोरे (३५ वर्ष) हिने मुलगा (१६ वर्ष) तिचा मित्र रोहित टेमकर आणि रिक्षा चालक प्रथमेश म्हात्रे यांच्या मदतीने कट रचून रोहित टेमकर यांनी उपलब्ध करून दिलेल्या नशेच्या गोळ्या सचिन मोरेला कारल्याच्या ज्यूसमध्ये टाकून प्यायला दिल्या.

सचिन मोरे नशेच्या गुंगीमध्ये असताना त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्याच्या बहाण्याने आरोपी रिक्षाचालक प्रथमेश म्हात्रेच्या रिक्षामध्ये पत्नी, मुलगा आणि सचिन मोरे हे रिक्षात बसून शगुन चौक, उलवे, डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरूळ, कळंबोली, एमजीएम हॉस्पिटल कामोठे, उरण, जेएनपीटी परिसर इत्यादी भागात फिरवून जासई येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ रिक्षा थांबवून रेश्मो हिने सचिनचा ओढणीने गळा आवळून खून केला आणि त्याला पुढे एखाद्या वाहनाखाली खाली फेकून देऊन अपघात झाल्याचे दाखवावे असे उद्देशाने पुढे रिक्षा चालवत घेऊन जात होते. दरम्यान, त्याला रिक्षामधुन बाहेर फेकणे शक्य नसल्याने आणि सचिन मिरे याचा परत श्वास सुरू असल्याचे रेश्मा यांच्या लक्षात आल्याने तिने परत त्याचे नाक आणि तोंड हाताने दाबून जिवे ठार मारले तसेच वहाळ खाडीवरील ब्रिजवर मुलगा आणि रिक्षा चालकच्या मदतीने सचिन मोरे याला फेकून दिले.

या गुन्ह्यातील मुलगा १६ वर्षाचा असल्याने त्याला बाल न्यायालयासमोर हजर केले आहे. तसेच तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उलवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने, सपोनि सुरेश खरात, पोउपनि स्वप्निल शेळके, पोउपनि आशुतोष देशमुख, पोहवा तांडेल, पोहवा गोसावी, पोशि परदेशी, पोशि घुगे, पोशि कोठुळे, पोशि रावळ यांनी केली आहे.





पनवेल : उलवे पसिरातील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते साईनाथ साळुंखे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शुक्रवारी सदिच्छा भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. दरम्यान, या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सोबत भाजपचे जिल्हा चिटणीस रूपेश धुमाळ, संतोष तुडमे, संदेश साळुंखे, सुदेश साळुंखे, प्रवीण ठाकूर आदी उपस्थित होते.



पनवेल : द अर्थ रियॉलिटी कार्यालयाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. त्यांनी अल्ताफ कच्छी आणि नईम शेख यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे तसेच रोहित आठवणे, अब्दुल कादिर कच्छी, अमजद कच्छी, सोबन कच्ची, झुहैब कच्छी, गझनफर खान,फारूक शेख, सलाम अन्सारी, कलीम खामकर आदी उपस्थित होते.

## गव्हाण विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या प्रेरणेने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रख्यात भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉक्टर चंद्रशेखर व्यंकट रमण यांच्या ' रमण इफेक्ट ' या संशोधनाच्या गौरवार्थ देशभर २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो.या निमित्ताने विद्यालयाच्या प्रांगणात डॉक्टर सी. व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे आणि प्रमुख अतिथी सई बैकर यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व विद्यालयाचे विज्ञान शिक्षक रवींद्र भोईर,एकनाथ ठाकूर,चित्रलेखा पाटील,योगिता पाटील, शितलकुमार म्हात्रे व प्रशांत परदेशी, सागर रंधवे,इउज्वला म्हात्रे ,अस्मिता वर्तक व संपदा म्हात्रे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी इयत्ता पाचवी ब चा विद्यार्थी वैष्णव देशमुख याने डॉक्टर सी.व्ही.रमण यांच्या वेशभूषेत ' मी डॉक्टर सी.व्ही.रमण बोलतोय !' या एकपात्री प्रवेशाद्वारे डॉक्टर सी.व्ही.रमण यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग उद्धृत केले.

यावेळी विज्ञान शिक्षक शितलकुमार म्हात्रे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या डॉक्टर सी.व्ही.रमण यांच्यासह अनेक भारतीय वैज्ञानिकांच्या छायाचित्र व त्यांच्या माहितीचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले.

# शिवसेनेतर्फे पनवेलमधील मनपा शाळांसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशिन्स

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून कौतुक; १० लाखांची मदत जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये महानगरप्रमुख तथा माजी नगरसेवक अॅड. प्रथमेश सोमण यांच्या कल्पनेतून व नेतृत्वात पनवेल शिवसेनेने महापालिका हद्दीतील ११ शाळांमधील गरीब व गरजू विद्यार्थिनींना त्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक असणारी सॅनिटरी पॅड्स ची व्हेंडिंग मशिन्स दान केली. या शाळांमध्ये शिकणाऱ्या अति सामान्य किंवा गरीब गरजू कुटुंबातील मुलींना त्यांच्या मासिक धर्मात आवश्यक असणारी सॅनिटरी पॅड्स आता शाळांमध्येच मोफत मिळणार आहेत.



पनवेल महापालिकेच्या अधिकारी स्वप्नाली चौधरी यांनी ही मशीन्स उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वीकारली. एकनाथ शिंदे यांनी या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले व ते एवढ्यावरच न थांबता अशाप्रकारे पनवेल शिवसेनेने हा नवीन पायंडा घालून दिला असून हे 'पनवेल मॉडेल' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येईल , सर्व महापालिकांमध्ये तसे आदेश देऊन अशी मशीन्स सर्व शाळांमध्ये बसवण्यात येतील असेही सांगितले तर पनवेल शिवसेनेला हा उपक्रम इतर भागातही सुरू ठेवण्यासाठी ताबडतोब रुपये दहा लाखांची वैयक्तिक मदतही एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथमेश सोमण यांच्यासह उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगर संघटक मंगेश रानावडे, उपमहानगरप्रमुख महेश सावंत यांनी संयुक्त प्रयत्न केले तर उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना महिला आघाडी यांनी कंबर कसली. यावेळी पनवेल शिवसेनेच्या संघटनात्मक बाबींवर देखील शिंदे यांचे सोबत चर्चा झाली तर पुढील महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आवश्यक त्या तयारी करण्याच्या सूचनाही एकनाथ शिंदे यांनी सोमण यांना दिल्या.

याप्रसंगी संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, महिला संपर्कप्रमुख शिल्पाताई देशमुख, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महिला जिल्हा संघटिका रीनाताई पाटील, महिला तालुकाप्रमुख मंदाताई जंगले, विधानसभा संघटिका यशोदा गायकवाड, महानगर संघटक मंगेश रानावडे, पनवेल शहर महिला संघटिका प्रीती खानविलकर उपतालुकाप्रमुख सतीश पाटील, तळोजे विभाग प्रमुख प्रकाश म्हात्रे, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे , महेश सावंत पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, मायनॉरिटी सेलचे अराफत पटेल, शहर संघटक अभिजीत साखरे,, अर्चना जाधव, कळंबोली शहर संघटिका ज्योतीताई पाटील, उपशहर प्रमुख शैलेश जगनाडे, प्रसिद्धीप्रमुख तोफिक बागवान, विभाग प्रमुख किरण पवार, मंदार काणे यासह पनवेल शिवसेना महानगर मधील इतरही पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

## 'सीकेटी'त विज्ञान दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने सी. के. ठाकूर विद्यालय नवीन पनवेल येथे विज्ञान प्रदर्षन आयोजि करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अभियंता प्रकाश चव्हाण व शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण , पर्यवेक्षिका निरजा मॅडम व सर्व शिक्षक उपस्थित होते.

सर सी.व्ही. रमण यांच्या सन्मानार्थ व भारताचे मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिप प्रज्वलन करून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांनी केले मुख्याध्यापक चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांच्या जीवनात उत्तम कामगिरी करण्यास प्रोत्साहित केले. तंत्रज्ञानाने गोष्टी कशा अधिक कार्यक्षम झाल्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील अमर्यादित संधी आपल्याला कशा उपलब्ध होऊ शकतात हे स्पष्ट केले.

विज्ञान विभाग प्रमुख स्वाती काळे व विज्ञान शिक्षिका. वैशाली लाऊत्रे, प्राची इसे, . केरी भोईर, किर्ती झावरे स्मिता भालेकर यांनी हा कार्यक्रम यषस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.



## शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी, शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

**पनवेलः वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक कार्यात अग्रेसर असणार्या लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी तसेच शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये दि.१३ रोजी होम (होळी पूजन), तसेच महिलांसाठी विविध क्रिडा स्पर्धा व पाचवी ते १० वी च्या मुलांचे क्रिकेट सामने, शनिवार दि.१५ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम, वेशभूषा, सिंगल डान्स, ग्रुप डान्स इ., रविवार दि.१६ रोजी लाईन आळी प्रिमियर लिग २०२५ भव्य ऑक्शन सोहळा, सोमवार दि.१७ रोजी शिवजयंती उत्सव तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षिस वितरण समारंभ आणि मराठी व हिंदी गीतांचा सदाबहार कार्यक्रम, मंगळवार दि.१८ रोजी मंडळातर्फे विभागातील नागरिकांसाठी कराओके गाण्यांचा एक आगळा वेगळा कार्यक्रम, बुधवार दि.१९ रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मार्गदर्शक रमेश गुडेकर, संस्थेचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष रवि (पिंट्या) गोरे, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, समीर कदम, सहकार्याध्यक्ष प्रकाश (नानु) वाघे, सहकार्याध्यक्ष प्रवीण पोवार, खजिनदार संतोष तळेकर, हिशोब तपासनीस अरुण ठाकूर, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, सहखजिनदार अनिकेत जाधव आदी आहेत.




पनवेल : नादस्फुर्ती ढोल ताशा पथकाने आपल्या सदस्यांना सध्या गाजत असलेला छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा चित्रपट दाखवला.

# सीकेटी कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विज्ञान संघटना व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयाने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी आले होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गेह रिसर्च, बेंगळुरू, कर्नाटक येथील संस्थापक डॉ. बी. के. सरकार (पेटंट गुरू), आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, जैवतंत्रज्ञान विभागांच्या प्रमुख, डॉ. एस. एस. कोकीतकर, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे तसेच विज्ञान शाखांच्या विविध विभागांचे प्रमुख यांनी उपस्थित होते.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात लोगो डिझाइन, सायन्स हर्डल, वैज्ञानिक प्रश्नमंजुषा स्पर्धा, ट्रेजर हंट, ,ओपन माईक स्पर्धा इत्यादींचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना भरघोस प्रतिसाद दर्शविला.

दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे डॉ. बी. के. सरकार यांनी आपल्या भाषणात पेटंटची निवड कशी करावी आणि पेटंट नोंदणी कशी करावी या विषयी माहिती दिली. यांनतर त्यांनी विविध विभागातील विद्यार्थ्यांशी त्यांच्या मध्ये दडलेल्या विविध कल्पनां विषयी संवाद साधला. तसेच राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचीत्य साधून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सायन्स हेराल्डचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी महाविद्यालयाच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा मागोवा घेतला. प्रा. जी. एस. साठे यांनी विज्ञान संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा दिला. या दिवशी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुणे डॉ. बी. के. सरकार , प्रो.डॉ. बी. डी. आघाव , वाणिज्य शाखा प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव व कला शाखा प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

जैवतंत्रज्ञान विभागाच्या डॉ. अनुप्रिता वाठारकर यांनी प्रमुख पाहुणे डॉ. बी. के. सरकार यांचा परिचय करून दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगणक विज्ञान विभागाच्या प्रा. रश्मी प्रभा व जैवतंत्रज्ञान विभागाची विद्यार्थिनी स्वर्णिम अम्बस्था यांनी केले. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एस. डी. चांडवेकर यांनी आभार मानले.

संपादकीय

# दक्षिणेतील अपप्रचार

नजीकच्या भविष्यात देशातील खासदारांच्या वाढणाऱ्या संख्येवरून उत्तर भारत विरुद्ध दक्षिण भारत असा प्रादेशिक संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे आतापासूनच दिसू लागली आहेत. या संदर्भात बोलताना लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेत दक्षिण भारतातील राज्यांवर अन्याय होऊ देणार नाही, अशी सुस्पष्ट ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अलीकडेच कोईमतूर येथे दिली.

**देशाच्या नव्या संसद भवनाच्या इमारतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगायचे झाले तर तिथल्या वाढलेल्या आसनसंख्येचा उल्लेख करावा लागेल. जुन्या संसद भवनात लोकसभेत ५५० आसनसंख्या होती तर नव्या लोकसभेत ८८८ खासदार बसू शकतील अशी व्यवस्था आहे. नजीकच्या भविष्याकडे लक्ष ठेवून केलेली ही सुविधा आहे. निरनिराळ्या राज्यांमधील खासदारांच्या संख्येतील संभाव्य वाढ लक्षात घेऊन राष्ट्रीय राजकारणातली आपली ताकद कमी होण्याच्या भीतीने दक्षिणेतील काही नेत्यांनी संभाव्य मतदारसंघ पुनर्रचना व विस्ताराविरोधात आतापासूनच ओरड सुरू केली आहे. जनगणनेच्या आधारे सीमांकन केल्यास तामिळनाडूला लोकसभेच्या आठ जागा गमवाव्या लागतील असा अपप्रचार द्रमुक पक्षाकडून सुरू आहे, परंतु या संदर्भातले सर्व खोटे दावे अमित शाह यांनी फेटाळून लावले आहेत. राज्यातील वास्तव प्रश्नांना बगल देण्यासाठी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन अनेक मुद्दे उपस्थित करत असून तामिळनाडूच्या लोकसभेच्या जागा सीमांकनानंतर कमी होतील असा दावा ते करत आहेत अशी टीकाही शहा यांनी केली. तामिळनाडूने कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबवल्यामुळे आपल्या राज्याला लोकसभेच्या आठ जागा गमवाव्या लागतील अशी भीती स्टॅलिन व्यक्त करतात. लोकसभा सीमांकनाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी त्यांनी ५ मार्च रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व राजकीय पक्षांनी या बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. स्टॅलिन यांच्या संबंधित दाव्यानंतरच शहा यांनी सीमांकनासंदर्भातला खुलासा केला. सीमांकनानंतरही दक्षिण भारतातील कोणत्याही राज्याच्या जागा कमी होणार नाहीत असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यापूर्वीच स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारची लोकसभा मतदारसंघांची प्रस्तावित पुनर्रचना दक्षिणी राज्यांसाठी अन्यायकारक आहे असे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही गुरुवारी म्हटले. लोकसभा मतदारसंघांची २०११च्या जनगणनेच्या आधारे पुनर्रचना झाल्यास लोकसभेच्या एकूण जागा ५४५वरून ७००पर्यंत वाढण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. तथापि, या वाढलेल्या जागा बहुतांशी उत्तर भारतीय राज्यांमधील असतील. दक्षिणी राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा आहेत तेवढ्याच राहण्याची किंवा कमी होण्याची शक्यता आहे असा अपप्रचार बिगरभाजप सरकार असलेल्या दक्षिणी राज्यांचे मुख्यमंत्री सध्या करीत आहेत. यासंदर्भातील वास्तव लक्षात घ्यायचे झाल्यास, १९७६मध्ये घटनादुरुस्ती करून २००१पर्यंत लोकसभेतल्या मतदारसंघांचा संख्याविस्तार गोठवला गेला होता. २००१मध्ये पुन्हा घटनादुरुस्ती करून तो २०२६पर्यंत गोठवण्यात आला. परिणामी लोकसभेची सदस्या संख्या ५४३ एवढीच कायम राहिली, पण या काळात देशाची लोकसंख्या वाढली. मतदारांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी लोकसभेच्या सदस्यांची संख्या वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध राज्यांमध्ये लोकसंख्या वेगवेगळ्या दराने वाढली असून मतदारसंघ पुनर्रचना व संख्याविस्तारासाठी ताज्या जनगणनेचा आधार घेतला जाणे स्वाभाविक आहे. देशातली शेवटची जनगणना २०११मध्ये झाली. २०21 सालची गणना अद्याप झालेली नाही. २००१च्या घटनादुरुस्तीनुसार २०२६नंतर लोकसभेतील जागांचा संख्याविस्तार होऊ शकतो.**


# थोर निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी

श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी ऊर्फ नानासाहेब धर्माधिकारी (१ मार्च १९२२ ते ८ जुलै २००८) दासबोधाचे निरूपणकार होते. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन व व्यसनमुक्ती क्षेत्रांत निरलसपणे कार्य केले. नानासाहेब धर्माधिकारी यांचे जगभरात लाखो अनुयायी आहेत.

नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाले. रेवदंड्याच्या शाळेत ते शिकत होते. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हात पाहून भविष्य सांगणे होता. धर्माधिकाऱ्यांच्या घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे. त्यांच्या घराण्याचे मूळचे आडनाव शांडिल्य असे होते. त्यांच्या भूतकाळातल्या आठव्या पिढीतील पूर्वज गोविंद चिंतामण शांडिल्य ऊर्फ शांडिल्य हे धर्मजागृतीचे काम स्वेच्छेने करायचे. त्या काळचे दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी त्यांना सन्मानाने 'धर्माधिकारी' अशी पदवी दिली. तेव्हापासून आजतागायत त्यांचे घराणे धर्माधिकारी हे आडनाव लावत आले आणि त्याला समर्पक असे धर्मजागृतीचे काम करीत आले.

डॉ. नानासाहेबांनी आपल्या पित्याकडून प्रेरणा घेऊन प्रसिद्धीपासून दूर राहून समाजाचे प्रबोधन करण्याचे सेवाव्रत घेतले आणि ते अव्याहतपणे चालवले. त्यांचे चिरंजीव दत्तात्रेय तथा आप्पासाहेब व नातू सचिनदादा यांनीही नानासाहेबांच्याच कार्याला वाहून घेतले आहे. त्यांचे पुत्र पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी या समाजप्रबोधनाच्या कार्याची धुरा वडिलांच्याच निष्ठेने आणि तळमळीने स्वतः करीत आहेत.

धर्माचरणाविषयी बोलताना, त्या अनुषंगाने समाजाला सन्मार्गाला लावण्याची शिकवण नानासाहेब धर्माधिकारी देत गेले. आधुनिक संदर्भात दासबोधाच्या कमालीच्या सोप्या निरूपणातून विकारी मनांची मशागत करताना निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. धर्म अर्थ काम आणि मोक्ष या अशा सर्वांगीण पुरुषार्थाची ओळख त्यांनी स्वतःची ओळख विसरलेल्या समाजाला करून दिली व आजही हे कार्य निष्काम त्यांचे पुत्र पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व नातू रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी यशस्वीरीत्या करत आहेत.



या कामासाठी त्यांनी १९४३ साली रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे श्री समर्थ आध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती स्थापन केली. या माध्यमातून ८ ऑक्टोबर १९४३ (विजयादशमी) रोजी मुंबई येथील गोरेगाव येथे प्रथम श्री बैठक सुरू करण्यात आली. या संस्थेद्वारे त्यांनी जगभरात अध्यात्माचा प्रसार केला. त्याच्या शाखा आज भारताबाहेरील अनेक देशांपर्यंत पसरल्या आहेत.

या संस्थेमध्ये आजघडीला मराठी बरोबरच हिंदी, उडिया, तामिळ, बंगाली, कन्नड व इंग्रजीतून निरूपण केले जाते. सुरुवातीला महिला व पुरुषांचीच बैठक होत असे, मात्र बालवयापासूनच संस्कार व्हावेत म्हणून बालोपासना सुरू करण्यात आली. अध्यात्माचे धडे देतानाच नानांनी शेकडो खेडी, आदिवासीपाड्यांची भ्रमंती करून लोकांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले होते. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अज्ञान, स्त्रियांवरील अत्याचार, जातिभेद अशा कुप्रवृत्तींवर जोरदार प्रहार करत नानासाहेबांनी सद्गुणांची पेरणी केली. त्यामुळे लाखो लोक व्यसनमुक्त होऊन परमार्थाकडे वळले.

२००८मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. कै. नानासाहेब धर्माधिकारी यांचे सुपुत्र आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराच्या वेळी खारघर येथील ५१० एकराच्या परिसरात ४० लाखांहून अधिक लोक जमा झाले होते. गर्दीच्या या उच्चांकाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्सर्मध्ये २०१०मध्ये नोंद झाली अशी माहिती आहे.

**❊ मिळालेले विविध पुरस्कार**

गुजराती महाजन भूषण पुरस्कार (१७-११-२०००)

जिल्हा परिषदेतर्फे रायगडमित्र (१३ मे १९९३)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे डी.लिट. या पदवीने सन्मानित करण्यात आले होते (१८-१-२००५).

पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे मानपत्र (१२-५-२००३)

पुणे महापालिकेतर्फे मानपत्र

पुण्याच्या महर्षी व्यास प्रतिष्ठानचा, महर्षी व्यास पुरस्कार (खोपोली, ११-१२-२००७).

महाडच्या हिरवळ प्रतिष्ठानचा समाजभूषण पुरस्कार (१-३-२००२)

महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार (३०-४-२०००)

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार (२९ जून १९९७)

रायगडभूषण

राष्ट्रीय एकात्मता कार्याबद्दल, सीरॉक (इंडिया) ठाणे यांचा 'सीरॉक इंडिया' पुरस्कार (१६-५-१९९९).

शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार (३१-१-२००३).

समर्थ व्यासपीठ, पुणेतर्फे शिवसमर्थ पुरस्कार (१५-११-१९९९).

समर्थ रामदासस्वामी भूषण पुरस्कार (१८-५-१९९९) **(साभार : इंटरनेट)**

# आज जागतिक नागरी संरक्षण दिन

देशातील नागरिकांचे जीवित, मालमत्ता तसेच नागरी संस्था, उद्योगधंदे, वसाहती इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहभागाने व शासकीय साहाय्याने उभारलेली व्यवस्था म्हणजे नागरी संरक्षणव्यवस्था होय. १ मार्च हा जगभरात जागतिक नागरी संरक्षण दिन म्हणून पाळण्यात येतो. शत्रूच्या सैनिकी, घातपाती, प्रचारकी वा तत्सम स्वरूपाच्या आक्रमक आणि विध्वंसक कृत्यांनी देशातील नागरी जीवनाची हानी होऊ शकते. त्याचप्रमाणे राष्ट्रांतर्गत घातपाती कारवायांमुळेही देशातील कायदा व सुव्यवस्था बिघडून नागरी जीवन विस्कळित होऊ शकते.

म्हणून आधुनिक काळात नागरी संरक्षण हे राष्ट्राच्या एकूण संरक्षणनीतीचाच एक अविभाज्य असा घटक मानला जातो. नागरी संरक्षणाची पारंपरिक कल्पना ही केवळ प्रतिबंधक उपायांपुरतीच मर्यादित असल्याचे दिसते तर शत्रूचे आक्रमण आणि विध्वंसक कारवाया यांपासून नागरिकांना झळ पोचू नये या हेतूने प्रतिकारात्मक व प्रतिबंधक अशी दुहेरी व्यवस्था आधुनिक काळात केली जाते. गावाला तटबंदी घालणे हा नागरी संरक्षणाचा एक जुना प्रकार होय.




आधुनिक काळात आक्रमणाचे, युद्धाचे आणि देशांतर्गत संघर्षाचे स्वरूप आमूलाग्र बदल्यामुळे नागरी संरक्षणाच्या कल्पनेतही बदल झालेला आहे.

नागरी म्हणजे बिनलष्करी लोकांचे संरक्षण, ही कल्पना आधुनिक काळातील नसून तिचे मूळ प्राचीन काळात सापडते. गावाला तटबंदी घालणे हा प्राचीन काळी सर्वत्र आढळणारा प्रकार नागरी संरक्षणाचाच एक भाग होता. हिंदुस्थानात तथाकथित उच्चवर्णीय लोकांनाच तटबंदीयुक्त नगराच्या आत वस्ती करता येत असे. संकटकाळी मात्र याच तटांच्या आत सर्वांना आश्रय मिळे. अठराव्या शतकापासून युद्धाचे स्वरूप बदलत गेले. ते केवळ रणांगणापुरतेच मर्यादित न राहता नागरी वस्तीपर्यंत फैलावले. नागरिकांवर सतत हल्ले केले, तर नागरिक शेवटी कंटाळून आपल्या राजकर्त्यास शरणागती पत्करण्यास भाग पाडतील, अशी विचारसरणी प्रभावी ठरली.

नागरी संरक्षणाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने ही संघटना उभारली आहे. नागरी संरक्षणाच्या योजना, उपाय व साधने यांसाठी मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्रालय जबाबदार असून त्यासाठी केंद्रात नागरी संरक्षण प्रसंचालक व त्याचे कार्यालय आहे. प्रसंचालक लेफ्टनंट जनरल या श्रेणीचा सैनिकी अधिकारी असतो. राज्यपातळीवरही नागरी संरक्षण संघटना असून त्यांची संचालयीन कार्यालये असतात.



## बदलते तंत्रज्ञान

# सावध व्हा! ही चूक केली तर फ्रिजचा होऊ शकतो ब्लास्ट

उकाडा वाढू लागला आहे, अनेकजण घरातील एसी साफ करून घेत असतील. एसी नीट साफ केला नाही तर त्याच्या कुलिंगवर परिणाम होतो, मग लाईट बिलही जास्त येते. परंतू, तुमच्या घरातील फ्रिजचे काय? आजकाल प्रत्येक घरात फ्रिज आहे. कोणाकडे सिंगल डोअर, कोणाकडे डबल डोअर आहे. या फ्रिजचेही वातावरणानुसार सेटिंग करावे लागते, नाहीतर स्फोट झाला म्हणून समजा...



एसीसारखाच फ्रिजसाठीही थोडे लक्ष द्यावे लागेल, नाहीतर मीटर धावत सुटेल आणि बिल येईल. याहून धोकादायक जर बाहेरच्या तापमानाप्रमाणे आतील तापमान ठेवले नाही तर एसीचा कॉम्प्रेसर सुरु राहून तुम्हाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अनेकदा फ्रिजचा स्फोट झाल्याचे ऐकले असेल.

अनेकांच्या फ्रिजमध्ये फ्रिजरचे आणि फ्रिजचे वेगवेगळे सेटिंग असते. अनेकांना आपला फ्रिज कोणत्या नंबरवर ठेवावा हे माहिती नसते. उन्हाळ्यात, हिवाळ्यासाठी आणि पावसाळ्यासाठी वेगवेगळे तापमान असते. उन्हाळ्यात खाद्यपदार्थ लवकर खराब होतात, यामुळे उकाड्याची झळ त्यांच्यापर्यंत पोहोचू नये म्हणून फ्रिजचा कॉम्प्रेसर सतत काम करत असतो. तापमान वाढवून ठेवले तर कॉम्प्रेसरला सतत काम करावे लागते. यामुळे स्फोट होऊ शकतो.

उन्हाळ्यात फ्रिज ३ ते ४ नंबरवर ठेवावा, जेणेकरून खूप जास्त थंड नाही, खूप कमी थंड नाही असे वातावरण तयार राहते. थंडीमध्ये फ्रिजचे सेटिंग १ नंबरवर ठेवावे. थंडीच्या काळात अनेकजण फ्रिज बंद मध्ये मध्ये करून ठेवतात. जे चुकीचे आहे. तसेच बराच काळ फ्रिज बंद केला तर त्याचा कॉम्प्रेसर जाम होऊ शकतो आणि चालू करताच तापून बिघडू शकतो.

फ्रिजची दुरुस्ती करताना अनेकदा पैसे वाचतात म्हणून किंवा दुरुस्त करणारा लोकल पार्ट वापरतो. यामुळे स्फोट होऊ शकतो. कॉम्प्रेसरची कंपनीच्या माणसाकडूनच दुरुस्ती करून घ्यावी आणि ओरिजिनल पार्ट वापरावेत. यामुळे फ्रिजच्या नादुरुस्तीकडे दुर्लक्ष करू नका.

# लेखिका गौरी देशपांडे

गौरी देशपांडे यांचा जन्म ११ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला. गौरी देशपांडे या चौकटीबाहेर लिहिणाऱ्या मराठीतील लेखिका म्हणून परिचित होत्या. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन, भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्यप्रकार गौरी देशपांडे यांनी हाताळले. मराठीबरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी अनुवादसुद्धा प्रकाशित झाले.

प्रसिद्ध लेखिका, संशोधक इरावती कर्वे या गौरी देशपांडे यांच्या मातोश्री होत. दिनकर धोंडो उर्फ डी. डी. कर्वे हे त्यांचे वडील. जाई निंबकर या इंग्रजी व मराठीतील लेखिका त्यांच्या थोरल्या भगिनी. प्रसिद्ध समाजसुधारक व स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे हे डी. डी. कर्वे यांचे वडील व गौरी देशपांडे यांचे आजोबा होते. 'समाजस्वास्थ्य' या लैंगिक शिक्षण देणार्या स्वातंत्र्यपूर्व काळातील मासिकाचे संपादक र. धों. कर्वे हे गौरी देशपांडे यांचे सख्खे काका.

गौरी देशपांडे यांचे पुण्यातच प्रामुख्याने वास्तव्य राहिले आहे. काही काळ मुंबईत, बर्याचशा परदेशवार्या व विंचुर्णी,मराठी साहित्याला स्त्री लेखिकांची मोठी परंपरा लाभली आहे. ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्यापासून ते अगदी आजच्या कविता महाजन, मोनिका गजेंद्रगडकर ह्याच्यापर्यंत असंख्य स्त्रियांनी निरनिराळ्या



निमित्त

पातळीवरून स्त्री आयुष्याच चित्र वाचकांपुढे उभं केलं. ह्या सगळ्या प्रभावळीत गौरी देशपांडे यांनी केलेल्या लिखाणाचं वेगळेपण हे विशेष आहे. त्याआधीच्या बर्याचशा साहित्यात स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न किंवा पुरुषी वर्चस्वामुळे निर्माण झालेले प्रश्न चर्चिले गेले होते. गौरी देशपांडे यांची पिढी ही स्वातंत्र्योत्तर पिढी होती.

स्त्रियांपुढचे प्रश्न बदलले होते. संपले नव्हते. स्त्रीने शिक्षणासाठी, नोकरीसाठी घराचा उंबरठा ओलांडण्याची सवय समाजाला झाली होती. गौरी यांची पिढी ह्या प्रश्नांपासून पुढे आली होती. समाजाने स्त्रीकडे 'व्यक्ती' म्हणून बघावं अशा विचारांच्या प्रभावाखाली होती.गौरी देशपांडे यांच्या साहित्याची सविस्तर सूची विद्या बाळ, गीताली वि. म., वंदना भागवत संपादित, मौज प्रकाशन गृह प्रकाशित कथा गौरीची या पुस्तकात वाचावयास मिळते. 'इशशींुशशप इळींही' या १९६८ साली प्रकाशित झालेल्या इंग्रजी काव्यसंग्रहाने गौरी देशपांडे यांचा लेखनप्रवास सुरू झाला.

गौरी देशपांडे यांच्या लेखनात तिच्या मुक्त विचारांचं प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसतं. तिचं लेखन स्त्रीवादी असण्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी होतं. वेगवेगळ्या पातळीवरचं प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा ह्याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणार्या कोणत्याही आधुनिक, मराठी साहित्यप्रेमी माणसाला गौरी देशपांडे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. तो एक अपरिहार्य टप्पा असतो, असंच तिचं लेखनकर्तृत्व आहे. लेखणीचा 'धीट'पणामुळे विशेष गाजली. दिवाळी अंकांमधून तिनं लिहिलेल्या काही छोटेखानी 'लोक'कथाही लक्षणीय आहेत.

गौरी देशपांडे यांच्या साहित्याबद्दल जी चर्चा झाली, ती मात्र तिने रंगवलेल्या देशीविदेशी प्रियकरांबद्दल आणि नायिकेच्या शरीरसंबंधांबद्दल. गौरीच्या लेखनात ह्या शरीरसंबंधांबद्दल धीट भाष्य आहे. ह्या धीटपणामुळे गौरीवर 'बंडखोर लेखिका' हा शिक्का मारला गेला. ह्या सगळ्या वर्णनातून गौरीने स्त्रियांच्या मानसिक आंदोलनांबद्दल आणि त्यांच्या लैंगिकतेबद्दल जे भाष्य केलं होतं, त्याकडे मात्र दुर्लक्ष झालं. अशा या महान लेखिकेचे १ मार्च २००३ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

बातमीतील बात




आरोग्य प्रहर

# हात आणि पायांच्या बोटांना वेदनेकडे दुर्लक्ष करणे गंभीर

बहुतेक लोकांच्या हात आणि पायांची बोटे दुखतात. या वेदनेकडे दुर्लक्ष केले जाते, पण जर ही समस्या दीर्घकाळ राहिली तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण, छोटीशी समस्या कधी कधी मोठ्या आणि महागड्या समस्येमध्ये बदलू शकते. त्याचे परिणाम भयंकर होऊ शकतात. हात-पायांच्या बोटांच्या वेदनांना हे लागू होते. या वेदना कधी कधी काही गंभीर आजारांचे लक्षण असू शकतात.



तुम्ही या वेदनेला सामान्य म्हणून दुर्लक्ष करू नका, कारण कधी कधी ही समस्या तुम्हाला मोठ्या संकटात पाडू शकतात. त्यामुळे हात-पायांच्या बोटांच्या वेदना कोणत्या प्रकारच्या आजारांची सूचक असू शकतात, याबद्दल जाणून घेऊया:

हात आणि पायांची बोटे वातामुळे दुखू शकतात. वातामुळे आणि ऑस्टिओआर्थ्राइटिसमुळे बोटांना जडपण येणे, सूज येणे, आणि बोटे लाल होणे यासारखी समस्या होऊ शकते. रक्ताचा संचार थांबल्यामुळे या समस्येची तीव्रता वाढते.

मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्येही हात आणि पायांच्या बोटांमध्ये वेदना होतात. याशिवाय, बोटे जड होणे, सूज येणे इत्यादी समस्या देखील येऊ शकतात. ही समस्या मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये सर्रासपणे दिसते

संसर्गामुळेही हात आणि पायांच्या बोटांमध्ये वेदना होऊ शकतात. बोट कापण्यामुळे किंवा इन्फेक्शन झाल्यास बोटाल सूज येणे, लाल होणे आणि वेदना होणे अशी समस्या निर्माण होऊ शकते.

गॅन्ग्लियन सिस्टमुळे हाताच्या बोटात आणि कंबरेत गाठी निर्माण होऊ शकतात. अशा स्थितीत त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, कारण ही समस्या वाढू शकते.

कार्पल टनल सिंड्रोम ही एक सामान्य समस्या आहे. जेव्हा नसं ताणले जातात किंवा सूज येते, तेव्हा बोटांमध्ये वेदना होऊ शकते. ही वेदना बोटांपासून सुरू होऊन हातापर्यंत पोहचू शकते. याशिवाय, पायांच्या बोटांमध्ये वेदना, सूज आणि लाल होणे देखील दिसू शकते. जर तुम्हाला यापैकी काही लक्षणे दिसत असतील, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# अलिबाग अपघातप्रकरणी एसटी बसचालकाला अटक

## ◆ तोडफोडप्रकरणी ३३ जणांवरही गुन्हा दाखल

**अलिबाग: प्रतिनिधी**

अलिबाग येथे गुरुवारी (दि. २७) एसटी बस धडकेने तरुणाचा मृत्यूप्रकरणी बस चालका विरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली आहे. त्याचबरोबर एसटी बसची तोडफोड करुन वाहतूक रोखून धरली म्हणून ३३ जणांवर अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अलिबाग शहरात एसटी बसस्थानकासमोर झालेल्या अपघातात जयदीप शंकर बना या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. संतप्त जमावाने दोन एसटी बसेसची तोडफोड केली. शहरातील रहदारीचा मुख्य मार्ग जवळपास तीन तास रोखून धरला. जमावबंदी आदेश लागू असतांना दीडशे ते दोनश जणांचा जमाव रस्त्यावर उतरला होता. त्यामुळे शहरात तणावाचे वातावरण होते. पोलीसांनी वांरवार विनंती करूनही जमाव शांत होत नव्हता. त्यामुळे शिघ्रकृती दलासह वाढीव पोलीस बंदोबस्त मागवून पोलिसांना परिस्थिती नियंत्रणात आणावी लागली.

या प्रकरणी आता आंदोलन करणाऱ्या आठ जणांसह इतर अज्ञात २० ते २५ जणांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, वाहतूकीस अडथळा निर्माण करणे, शांतता भंग करून तणाव निर्माण करणे यासारख्या कलमांखाली या सर्वांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उप निरीक्षक प्रतिक पाटील या प्रकरणाचा तपास करत आहेत.

या तरुणाच्या अपघाती मृत्यूस कारणूभूत ठरलेल्या एसटी बस चालक योगेश अडसूळ रा. पाटोदा, जिल्हा बीड विरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक संतोष भुडोरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# खोपोलीत पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीत मिक्स होतेय सांडपाणी



खोपोली खालापूर संघर्ष समिती आक्रमक

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील शंकर मंदिर तलाव येथे पाताळगंगा नदीमधून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीमध्ये विरेश्वर व लेक व्यूव बिल्डिंगच्या मागील बाजूने येणारे दूषित पाणी व सांडपाणी जलवाहिनी लिकेज असल्याने त्यात मिक्स होत असल्याने या भागात दूषित पाणी येत आहे.

संघर्ष समितीने हा प्रकार प्रशासनास वेळोवेळी निदर्शनास आणून दिलेला आहे. खोपोली नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी रणजित पवार व पाणीपुरवठा विभागाचे भोईर यांनी २८ फेब्रुवारी रोजी आपल्या स्टाफसोबत सदर स्थळी पाहणी केली व यातून मार्ग काढण्याचे सांगीतले आहे. याशिवाय सदर सांडपाणी हे पाताळगंगा नदीत सोडत असल्याने पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न देखील उपस्थित होत आहे.

संपूर्ण शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनी लिकेज असल्याने त्यामध्ये सांडपाणी जाणे ही नागरिकांच्या आरोग्याशी खेळणारी बाब आहे. संबंधित समस्या त्वरित दूर करावी व नदीत सांडपाणी सोडणाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या समस्यांचे निराकारण न केल्यास नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या वतीने उग्र आंदोलन करण्याची भूमिका यावेळी संघर्ष समितीच्या वतीने घेण्यात आली.

प्रशासनाने त्वरित गळती बंद करण्यासाठी ठोस पाऊले उचलावीत व पाताळगंगा नदीत थेट सांडपाणी सोडणाऱ्यांवर कारवाई करावी असे खोपोली खालापूर संघर्ष समितीच्यावतीने शेखर जांभळे व किशोर साळुंखे यांनी म्हटले आहे. भक्ती सोसायटी रहिवाशांना फटका आठवडाभरापूर्वी गगनगिरी आश्रम शेजारी असणाऱ्या भक्ती सोसायटीमध्ये दुषीत पाणी प्यायल्याने आख्या सोसायटीमधील रहिवासी जुलाब, उलटी ताप थंडी अशा गॅस्ट्रोच्या साथीच्या लागीने आजारी होते.

# 'पोस्को महाराष्ट्र स्टील'तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी नकाशे साहित्य वाटप

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा मूलभूत आधार असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत परिसरातील ५५ शाळांमध्ये नकाशे वाटप उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. या उपक्रमांतर्गत जवळपासच्या ५ केंद्रशाळा आणि इतर ४४ शाळांचा समावेश आहे. तसेच ६ माध्यमिक शाळांमध्येही नकाशे वितरित करण्यात आले आहेत.




शालेय शिक्षणात नकाशांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, भौगोलिक संकल्पना समजावून घेण्यासाठी ते उपयुक्त ठरतात. ही गरज लक्षात घेऊन पोस्को महाराष्ट्र स्टीलने प्रत्येक शाळेसाठी वर्गानुसार ४-४ नकाशे वितरित केले, ज्यामध्ये जग, भारत, राज्य, जिल्हा यांचे भौगोलिक नकाशे, पृथ्वीगोल, भिंग, घड्याळ, फुटबॉल यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना नकाशांचा योग्य प्रकारे उपयोग करता यावा आणि त्याचा अभ्यासात अधिक प्रभावी वापर करता यावा, यासाठी कंपनीच्या विविध विभागातील ३४ अधिकाऱ्यांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन केले. नकाशा वाचनाचे महत्त्व समजावून देत, नकाशांमधून कोणती माहिती मिळते, त्यांचा अभ्यास कसा करावा आणि त्यांचा प्रभावी उपयोग कसा करता येईल यावर चर्चा करण्यात आली.

शाळेतील शिक्षकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. शिक्षकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नकाशांचा वापर करून शिकवता आल्यास त्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होते. पोस्को महाराष्ट्र स्टीलने दिलेल्या या नकाशांमुळे आमच्या अध्यापन प्रक्रियेत मोठी मदत झाली आहे. हे नकाशे केवळ भूगोल शिकण्यासाठीच नाही तर इतिहास, नागरीकशास्त्र आणि पर्यावरण विषयांसाठीही उपयुक्त ठरणार आहेत.

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी शिक्षण क्षेत्रात सातत्याने योगदान देत असून, स्थानिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणसाहित्य आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. याआधीही कंपनीने शाळांना संगणक, शालेय साहित्य, तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत. कंपनी केवळ भौतिक साहित्य किंवा भौतिक सुविधा पुरवण्यावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करत आहे.

भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवण्याचा मानस पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# बिरवाडी येथून एकजण बेपत्ता

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी येथून एक चाळीस वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची घटना नुकतीच घडली असून याबाबत नातेवाईकांकडून महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील बिरवाडी गावातील कांळीज येथील रहिवासी संतोष अनंत भावेकर वय ४० हे दिनांक १७ फेब्रुवारी रोजी ११:४५ वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरातून कोणासही काही न सांगता निघून गेले.

बरीच शोधाशोध करूनही त्यांचा शोध न लागल्याने अखेर नातेवाईकांकडून बुधवार २६ फेब्रुवारी रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात याबाबत रीतसर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# रेवदंड्यातील गुणकारी व चवदार मेथीची भाजी; चुनेकर कुटुंबियांचा पारंपरिक व्यवसाय

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मेथीची भाजी रोजच्या आहारात स्वयपाक घरात नेहमीच आवडीने बनविली जाते, गुणकारी व रूचकर अशी मेथीची भाजी खुपच प्रसिध्दीस असून ही मेथीची भाजी रेवदंडा पंचक्रोशीसह पेण, अलिबाग, रोहा, व मुरूड तालुक्यातील भाजी मार्केट मध्ये हमखास विक्रीस ठेवलेली आढळते. विशेषतः रेवदंडयातील चुनेकर कुटूंबियांनी पारपांरीत मेथीचा आर्थिम उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय गेली अनेक वर्ष जोपासला आहे.



रेवदंडयातील प्रसिध्द मेथीची भाजी, घराघरातून गृहीणीची पंसती असते, मेथीच्या भाजी अंत्यत गुणकारी असून अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. मेथीची भाजीचे नियमित सेवन करा असे आयुर्वेद डॉक्टरांनी सांगतात. विशेषतः मेथीची भाजी हिवाळयात मेथीच्या उष्णतेमुळे शरिरात उष्णता निर्माण होवून शरिराचे तापमान संतुलीत राखण्यास मदत होते. आयुर्वेदानूसार मेथीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, लोह, फायबर, आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. मेथीची भाजी खाल्ल्याने हिवाळयात शरीर उबदार तर राहतेच याशिवाय अनेक आजारापासून सरक्षंण मिळते. मेथीची भाजी सेवनाने त्वचा निरोगी राहते, तसेच त्वचेला मुलायम चमकदार तसेच सुंदर बनविण्यास मदत करते. कारण मेथीच्या भाजी मध्ये ॲटि ऑस्विडंट, व्हिटॅमिन आणी मिनरल्स असतात. असे अनेक आरोग्यदायी फायदे मेथीची भाजी सेवन केल्याने होते.

रेवदंडयातील चुनेकर कुंटूबिय पारंपारीक मेथी उत्पन्न घेते. रेवदंडा समुद्र किनारी लगतची कसदार वाळू मेथी लागवडीस उत्तम असते. मेथी भाजीचे उत्पन्न मिळविणे फारच कष्टदायक व मेहनतीचे असते. मेथीच्या भाजी साठी वाळूचे वाफे तयार करणे, या तयार वाफांना पाणी देणे, तयार झालेल्या वाफांवर मेथील पेरणे, त्यानंतर या वाफांना मुबलक पाणी देणे, साधारणतः पाच ते सहा दिवस तयार मेथीच्या वाफांची निगा घ्यावी लागते, या वाफांना सकाळ संध्याकाळ पाणी देणे, दुपारी या वाफांवर सुपारी वृक्षाची झावली, माडापासून तयार झालेले झाप आदीचे आवरणाने झाकून ठेवावे लागते. शिवाय गुरे,ढोरे, तसेच पाळीव प्राण्यापासून या तयार मेथीच्या वाफांचे सरक्षंण ठेवावे लागते. साधारणतः पाच ते सहा दिवसांत वाळूच्या मातीत वाफांमध्ये पेरलेल्या मेथीपासून मेथीची पालेमय भाजी तयार होते. वाळू वाफांवर तयार मेथी भाजीचे जुडया बनविणे, आणि त्या घाउक विक्रेते, व किरकोळ विक्रेते यांना विक्री करणे आदी खुप परिश्रम घ्यावे लागते. घाउक व किरकोळ भाजी विक्रेत्यांनी खरेदी केलेली मेथीची भाजी पंचक्रोशीतील बहूतांश भाजी मार्केट मध्ये विक्रीस असते. विशेषतः सोमवार, मंगळवार, गुरूवार व शनिवार या उपवासाचे दिवशी या मेथीच्या भाजीला मागणी मोठी असते.

बियाणं रूपी मेथील खरेदीत खुप दरवाढ झाली आहे तसेच या व्यवसायाला खुप शारिरिक परिश्रम आहे. शिवाय इतर अनेक भाजीपाल्यांसोबत या मेथीच्या भाजीला ग्राहकांसाठी मोठी स्पर्धा असते. शिवाय ही भाजी नाशवंत असल्याने निदान एका दिवसात विक्री होणे गरजेचे असते. त्यामुळे हा पारंपारीत मेथीची भाजी उत्पन्नाचा व्यवसाय करणे जिकीरीचे बनले आहे. मात्र कुटूंबियाचे आर्थिक उत्पन्न असल्याने फार कष्टाने व परिश्रमाने हा मेथी भाजी उत्पन्नाचा व्यवसाय सांभाळीत असल्याचे उदय चुनेकर यांनी म्हटले.

# साई येथील रेशनिंग धान्यात लेंड्या, दगड, खडी व भुसा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील साई गावामध्ये रास्त भाव धान्य दुकानातून मिळालेल्या मोफत रेशनिंगच्या धान्यात उंदरांच्या लेंड्या, दगड, खडी व भुसा आल्याने ग्राहक वर्गामध्ये संतापाची लाट उसळलेली आहे. साई मधील रास्त भाव धान्य दुकानांमध्ये साईगाव, बौद्ध वाडी, आदिवासी वाडी, खैरेवाडी, साई कोंड,उसर इत्यादी गावातील ग्रामस्थ धान्यासाठी येत आहेत. खैरेवाडी सारख्या गावामध्ये हे मोफतचे धान्य घेऊन जाण्यासाठी ३०० रुपये देऊन खाजगी गाडी किंवा रिक्षातून हे धान्य घरापर्यंत न्यावे लागत आहे.



या धान्यांमध्ये उंदरांच्या लेंड्या, खडी, भुसा हेही सर्व पैसे देऊनच घरी न्यावे लागत आहे. ही नागरिकांची केलेली कुचेष्ठा माणगाव अन्न पुरवठा विभाग थांबवून नागरिकांना न्याय देतील का असा सवाल ग्राहकांकडून ऐकावयास मिळत आहे.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ ई-मेल : panvelcorporation@gmail.com
अग्निशमनविभागः- २७४६१५०० फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

### अग्निशमन विभाग

**दरपत्रक मागणी सुचना**

याद्वारे सर्व व्यावसायीक / कंत्राटदार...ई यांना सुचित करण्यात येते कि, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील MH ४६ BM३५१४ या वाहनाचा विमा काढण्याकरीता अंदाजीय दरपत्रक मागणी करण्यात येत आहे तरी याकामी सर्व शासकिय अधिकृत विमाधारक ईच्छुकांनी आपले दर बंद लिफाफ्यात सदरची जाहिरात प्रसिद्ध झालेच्या नंतर तीन दिवसांत सादर करावेत.

सदर वाहनाच्या अधिक माहितीकरीता मुख्यालय पनवेल अग्निशमन केंद्र येथे संपर्क साधावा.

जा.क्र :-पमपा/अग्नि./२६२१/प्र.क्र.१७/९५१७३७/२०२५
दिनांक :- २८/२/२०२५

सही/-
उपायुक्त मुख्यालय (I)
पनवेल महानगरपालिका


# विवाहितेचा विनयभंग करून शिवीगाळ व दमदाटी; दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

विवाहित महिलेसोबत अश्लील संभाषण तसेच शिवीगाळ व दमदाटी केल्याप्रकरणी आरोपी पती-पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना महाड तालुक्यात नुकतीच घडली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार महिला ही विवाहित असून महाड तालुक्यातील रहिवासी आहे. सदर महिलेला एका ४० वर्षीय विवाहित इसमाने ऑक्टोबर महिन्यात एके दिवशी मध्यरात्री ही महिला विवाहित आहे हे माहीत असतानादेखील तिच्या घराजवळ येऊन तू मला आवडतेस असे बोलून ही गोष्ट तू कुणाला सांगू नकोस आणि तुझ्या नवऱ्याला पण सांगू नकोस असे असभ्य संभाषण केले.

सदर विवाहित महिलेने ही बाब तिचे पती व सासूला सांगितल्याने आरोपी इसमाच्या पत्नीने २२ फेब्रुवारी रोजी या विवाहित महिलेला तु ही गोष्ट मला का नाही सांगितलीस असे बोलून शिवीगाळ केली. त्याचवेळी आरोपी इसमदेखील तिथे आला आणि तुला ही गोष्ट मी कुणाला सांगू नकोस हे सांगूनसुद्धा तू ही गोष्ट नवऱ्याला का सांगितलीस असे बोलून विवाहितेला शिवीगाळ करून तू मला यापुढे भेट मी तुझ्या अंगावरच हात टाकेन अशी दमदाटी केली.

याबाबत या पीडित विवाहित महिलेने या पती-पत्नीविरोधात बुधवार २६ फेब्रुवारी रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून त्यानुसार पोलिसांनी प्रदीप सुतार व ज्योती सुतार या दोघा पती-पत्नीविरोधात गुन्हा दाखल केला असून या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


## म्हसळा नगरपंचायत म्हसळा

मु.पो.ता.म्हसळा, जि.रायगड

Email ID :-mhaslanagarpanchayat@gmail.com ऑफिस फोन नं. ०२१४९-२३२२४५

जा/क्र. म्हनप २१४३/म्हनप २०२४-२५ दिनांक :- २८/०२/२०२५

**जाहिर सूचना नोटीस बोर्ड**

म्हसळा नगरपंचायत हद्दीमध्ये सर्व नागरीक व खाजगी संस्था, राजकीय पक्ष, सर्व आस्थापना, सार्वजनिक मित्रमंडळे, सर्व ग्रामस्थमंडळे, सामाजिक कार्यकर्ते यांना सूचित करण्यात येते कि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे PIL १७३/२०१० अंतर्गत दिनांक १६/०८/२०१६ रोजीच्या निर्देशानुसार अनधिकृत/अनियमित ध्वनी प्रदुषण, तात्पुरते मंडप उभारणे, ध्वनीक्षेपकाचा, मोठे सण / कार्यक्रम करीता शहरात मनाई आहे.

त्यानुसार म्हसळा नगरपंचायत कार्यालयाकडून विहित कार्यपध्दतीने परवानगी घेतले नंतरच असे अधिकृत ध्वनी प्रदुषण, तात्पुरते मंडप उभारणे, ध्वनीक्षेपकाचा, मोठे सण / कार्यक्रम करण्यात यावेत अन्यथा मा. न्यायालयाचे निर्देशानुसार बेकायदा/अनधिकृत तात्पुरते मंडप उभारणे, ध्वनीक्षेपक, तात्काळ जप्त करणेचे व फौजदारी कारवाई प्रक्रिया करण्यात येईल.

तरी आपलेमार्फत व आपल्या पक्षामार्फत / संस्थामार्फत /मंडळामार्फत तात्पुरते मंडप उभारणे, ध्वनीक्षेपकाचा, मोठे सण / कार्यक्रम असल्यास नगरपंचायत कार्यालयाकडून विहित कार्यपध्दतीने परवानगी घ्यावी. तसेच मंडप उभारणे, ध्वनीक्षेपकाचा, मोठे सण / कार्यक्रमाबाबत परवानगी संबधित नगर पंचायतीचे नोडल अधिकारी श्री. विशाल अशोक मोरे, यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक अनुक्रमे ९१३०१०२५७८ यावर संपर्क साधावा.

सही/-
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत, म्हसळा



## खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६४२१२ Email ID :- cokmckhopoli@gmail.com

### दरपत्रक सुचना

जा.क्र.केएमसी/संगणक/३३९६ दिनांक : २७/०२/२०२५

नगरपरिषद कार्यालयीन कामकाजासाठी Bulk SMS Gateway पुरविणे या कामाचे दरपत्रक मागविणेकामी खालील साहित्याचे दर मंजुर नसल्याने सदरचे काम करणे करीता इच्छुक संस्थेकडुन जाहीर पध्दतीने दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपाशील | नग |
| --- | --- | --- |
| १ | नगरपरिषद कार्यालयीन कामकाजासाठी Bulk SMS Gateway पुरविणेबाबत. | १,००,००० SMS करीता दर |

**नियम व अटी :-**

१) दर १,००,००० SMS करीता सर्व करासहीत देण्यात यावे.
२) सदरील कामाचे दरपत्रक दि.०१/०३/२०२५ ते ०७/०३/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेत स्विकारले जातील.
३) सर्व शासकीय कराची व शुल्काची रक्कमेची कपात बिलातून करणेत येईल.
४) कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवलेले आहे.
५) दरपत्रक शक्य झाल्यास दि.०७/०३/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोईप्रमाणे उघणेत येतील.

सही/-
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद


# नवी मुंबईतील पर्यटनाचा आराखडा तयार

## शहरात होणार मत्स्यालय, संग्रहालय, फुलपाखरू गार्डन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राचा बहुतांश विकास झालेला असून लगतच्या परिसरातील नागरिकांची देखील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य असावे याबाबत पसंती असते. तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचाभविष्यात पर्यटनाच्या दृष्टीने विकास साध्य करण्यासाठी तसेच पर्यटनाला चालना मिळावी याकरिता पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास करण्याकरिता 'पर्यटन विकास आराखडा 'तयार करण्यात येत आहे. त्यात मत्स्यालय, मरिना, संग्रहालय, फुलपाखरू गार्डन अशी अनेक पर्यटन स्थळे विकसित केली जाणार आहेत.

खाडीकिनारी मरीना पार्क विकसीत करण्याची योजना असून यामुळे शहराच्या पर्यटनामध्ये भर पडणार आहे. महानगरपालिका या प्रकल्पाशी संबंधित आवश्यक त्या सुविधा निर्माण करणार आहे. नवी मुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मॅनग्रोव्ह झाडे आहेत. त्याठिकाणी वन विभागाच्या मदतीने मॅनग्रोव्ह पार्कची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.



अंग्रजालय हे समाज शिक्षणाचे महत्वाचे केंद्र आहे. कलादालनात एका विशिष्ट विषयापुरती, तात्पुरत्या स्वरूपात प्रदर्शनीय वस्तूची मांडणी केलेली असते, तर संग्रहालयात ही मांडणी कायमची व रचनाबध्द असते. अशी वास्तू न.मुं.म.पा. मध्ये भविष्यात उभारण्यात आल्यास त्या वास्तूचा न.मुं.म.पा. क्षेत्रातील विविध वयोगटातील जनतेला निश्चित फायदा होणार आहे.

बेलापूर विभागातील नेरूळ, से. २८,भू.क्र.५ए येथील ७७७३.६८ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मत्स्यालय या प्रयोजनाकरिता राखीव ठेवण्यात आलेला आहे. या भूखंडावर आधुनिक मत्स्यालय बांधणे प्रस्तावित आहे. सद्यास्थितीत नवी मुंबई शहरात पर्यटन विकासाच्या दृष्टीने महानगरपालिका क्षेत्रामध्ये आधुनिक मत्स्यालय उभारणी होणे गरजेचे आहे. सदर आधुनिक मत्स्यालयामुळे नवी मुंबई क्षेत्रात पर्यटन विकासास चालना मिळेल तसेच परिसरातील नागरिक, शालेय विद्यार्थी यांना माश्यांच्या विविध प्रजातीचे ज्ञान मिळणार आहे.सदर मत्स्यालयनवी मुंबई महानगरपालिका व मत्स्य विभागाच्यावतीने संयुक्तपणे करण्याचे प्रस्तावित आहे.

गवळी देव पर्यटन स्थळाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या डोंगराला देखील खारघरच्या पांडव कड्यासारखे महत्व आहे. त्यामुळे पावसाळ्यात पर्यटक या ठिकाणी येत असतात . या ठिकाणी पदपथ बांधणे, गझेबो बांधणे, गॅबियन भिंत बांधणे, विद्युत रोषणाई करणे, पिण्यासाठी पाणी इ. कामे करण्यात येत आहेत. सदरचे स्थळ सुशोभिकरण करुन विकसीत केल्याने पर्यटन स्थळ म्हणून नवी मुंबई शहराची ओळख निर्माण होणार आहे. आगामी अर्थसंकल्पीय वर्षात निसर्ग उद्यान, कोपरखैरणे येथील अविकसित भागामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे बोटॅनिकल उद्यान तयार करण्याचे नियोजन आहे.

नवी मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर होत असून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी तसेच शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वनस्पती शास्त्रासंबंधित भर पडण्यासाठी यामुळे मदत होईल. पालिकेकडून फुलपाखरू उद्यान बनवण्याची संकल्पना आखली जात आहे. फुलपाखरे, किटक, मधमाश्या आकर्षित होतील अशा वनस्पती/वृक्ष यांची जास्तीत जास्त लागवड करुन त्यांचे संवर्धन करण्यात येईल.

# उरणमध्ये शिवसंदेश यात्रा उत्साहात

**उरण : बातमीदार**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय अंतर्गत राजयोगिनी तारादीदी यांच्या मार्गदर्शनाखाली उरणमध्ये महाशिवरात्रीचे औचित्य साधून शिवसंदेश यात्रा (शोभा यात्रा) काढण्यात आली. पत्रकार विठ्ठल ममताबादे यांच्या हस्ते या शिवसंदेश यात्रेचे उदघाटन झाले.

श्रीफळ वाढवून, हिरवा झेंडा दाखवून या यात्रेची सुरवात झाली. उरण शहरात स्वामी विवेकानंद चौक ते एन आय हायस्कूल, महात्वली, नागाव, विमला तलाव या मार्गाने ही शिव संदेश यात्रा काढण्यात आली. विमला तलाव येथे या यात्रेचा समारोप झाला.दरवर्षी शिव संदेश यात्रेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी या शिव संदेश यात्रेत १००हुन अधिक भाविक भक्त या यात्रेत सहभागी झाले होते. नागरिकांना, भाविक भक्तांना अध्यात्मिक ज्ञान मिळावे, राजयोगाची माहिती व्हावी, महाशिवरात्रीचे महत्व कळावे, अध्यात्म व राजयोगाचा प्रचार व प्रसार व्हावा या अनुषंगाने सदर शिव संदेश यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ब्रह्मकुमारी तारादीदी यांनी दिली.

यानंतर भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रविशेठ भोईर यांच्या हस्ते शिव ध्वजारोहण झाले. या वेळी विविध मान्यवर उपस्थित होते. महाशिवरात्रीच्या दिवशी अध्यात्मिक रहस्य या विषयावर ब्रह्मकुमारी तारादीदी यांनी भाविक भक्तांना मार्गदर्शन केले.

उरण शहरातील पालवी हॉस्पिटल समोर असलेल्या अयोध्या अपार्टमेंट, महानगर बँकेच्या वरती, पहिला मजला येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे केंद्र आहे. या ठिकाणी दररोज सकाळी ७ ते ९ व संध्याकाळी ५ ते ७:३० या वेळेत अध्यात्मिक ज्ञान व राजयोगाचे मार्गदर्शन विनामूल्य केले जाते. अशा या अध्यात्माचा व राजयोग मार्गदर्शनाचा नागरिकांनी, भाविक भक्तांनी मोठया प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन ब्रह्मकुमारी तारादीदी यांनी केले आहे.



## निवडक

### गर्दुल्यांवर कारवाईची मागणी

**पनवेल :** नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्स परिसरात गर्दुल्यांचे वास्तव्य होत असल्याने हा मोठा चिंतेचा विषय बनत चालला आहे. या गर्दुल्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. शिवा कॉम्प्लेक्स येथील जुनी पोलिस चौकी पडलेल्या अवस्थेत असून गेली कित्येक महिने बंद आहे. चौकी बाहेर रात्री गर्दुल्ले झोपलेले असतात. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे व हेच गर्दुले परिसरात छोट्या मोठ्या चोऱ्या तसेच रात्री ये-जा करणाऱ्या नागरिकांना लुटणे हा प्रकार करीत असतानाही खांदेश्वर पोलिसांकडून कारवाई होण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

### 'विद्याभवन'मध्ये मराठी गौरव दिन



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात मराठी भाषा गौरव दिन कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील विविध गाणी आणि पारंपरिक नृत्य सादर केले. मराठी शिक्षिका वर्षा निकम यांनी मराठी भाषेला नुकत्याच मिळालेल्या अभिजात दर्जाची माहिती दिली. समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी मायबोली मराठीचे महत्व स्पष्ट केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक गोरख कदम, श्रीजा नायर, आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणिती कळंत्रे आणि समृद्धी गायकर या विद्यार्थिनींनी केले.

### मराठी राजभाषा दिन साजरा

**उरण :** उरण शहरातील देऊळवाडी येथील श्री गोपाळकृष्ण वाचनालय येथे मराठी राजभाषा गौरव दिन झाला. श्री गोपाळकृष्ण वाचनालयात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. कविवर्य कुसुमाग्रज यांनी मराठी साहित्यातील कविता, कादंबरी, नाटक तसेच ललित लेख मांडण्यात आले होते. या वेळी श्री गोपाळकृष्ण वाचनालयाच्या अंजली कालेकर,वृषाली पाठारे, कर्मचारी व समाजसेवक मोहन माली, वाचक वर्ग उपस्थित होते.



# बार्न्स कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, पनवेल. महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. २७ फेब्रुवारी हा ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचा दिवस, जो मराठी भाषेच्या गौरवासाठी समर्पित आहे. मराठीच्या समृद्ध परंपरेचा सन्मान राखत, विद्यार्थ्यांना भाषेच्या जतन व संवर्धनाची जाणीव करून देण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कल्पेश कृष्णा भोईर होते. प्रा. प्रशांत पाटील यांनी कार्यक्रमाच्या उद्देशाचे सुंदर प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रा. रूपाली अहिवले यांनी अत्यंत प्रभावीपणे सांभाळली. मराठी भाषेच्या भवितव्यावर प्रकाश टाकण्यासाठी आणि तरुणांना विचारमंथनासाठी प्रवृत्त करण्यासाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मराठी भाषा आणि आपली ओळख, मराठी भाषा जपण्यासाठी तरुण पिढीची भूमिका, मराठीतून शिक्षण गरजेचे का? या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी विचार मांडले. स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विशेषतः पल्लवी पडवणकर, मानसी मोरे आणि क्कोमल दुर्गे यांनी प्रभावी भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या समृद्धतेविषयी तसेच तिच्या जतनासाठी आवश्यक उपाययोजनांविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले. विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद आणि भाषेवरील प्रेम पाहून महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग भारावून गेला.

# सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघातर्फे महिला दिनानिमित्त उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ, पनवेलतर्फे महिला दिनानिमित्त अभिनव उपक्रम राबवण्यात येणार आहे.

महिला दिनानिमित्त महिला सदस्यांना आपल्या घरी पुन्हा वापरणे योग्य जुने कपडे व्यवस्थित धुऊन घडी करून द्यावे अथवा भेट आलेल्या पण आपण वापरत नसलेल्या नवीन साड्या देखील चालतील त्या दिनांक ५ मार्च २०२५ पर्यंत आपल्या ऑफिस मध्ये द्याव्या. सदर कपडे आदिवासी पाड्यावर वाटप केले जातील किंवा त्याचा पुनर्वापर करता येईल अस्या संस्थांना संपूर्द केल्या जातील.यासाठी उस्फुर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघा तर्फे करण्यात आले आहे.

यासाठी त्यांनी शॉप नं. १७, गेहलोत रेसिडेन्सी, सेक्टर -१ड, नवीन पनवेल या ठिकाणी संध्याकाळी ०७ ते ०९ या वेळेत प्रिया खोबरेकर( ९३२२६४५६९३), प्रिता भोजने (९९६९३९१३५२) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे

# दिवाळे गावातील स्मशानभूमीचे भूमिपूजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळे गाव-स्मार्ट व्हिलेज च्या अंतर्गत या गावाचा केवळ तीन वर्षांत आमदार मंदा म्हात्रे यांनी कायापालट केला आहे. याच अनुषंगाने दिवाळे गावातील नागरिकांना अंत्यसंस्काराकरिता असलेली स्मशाभूमी निकृष्ट झाली होती हे लक्षात घेऊन आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांतून पाच कोटी ५० लाख रुपये उपलब्ध करून दिवाळे गावात सुसज्ज व सर्व सुविधायुक्त अशी स्मशानभूमीचे भूमिपूजन गुरुवारी (दि.२७) दिवाळे ग्रामस्थांच्या हस्ते झाले.



स्मशानभूमी परिसरात अंत्यसंस्काराकरिता उत्तम दर्जाचे दहन शेड, प्लॅट फॉर्म, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, भांडार खोली, प्रसाधन गृह, सुरक्षा रक्षक केबिन तसेच इतर सुविधा दिवाळे गावातील नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

या वेळी दिवाळे गावात महत्वकांशी सुरु असलेल्या विकास कामांची पाहणी आमदार मंदा म्हात्रे यांनी करून दिवाळे गावातील विविध समस्या त्यांनी ऐकून घेत या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत फगेवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष अनंता बोस, खांदेवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष रमेश हिंडे, मच्छीमार संस्थेचे अध्यक्षडोलकर मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष तुकाराम कोळी, एकविरा महिला मच्छीमार संस्थेचे अध्यक्षा सुरेखा कोळी, मानाची पालखी दिवाळे कोळीवाड्याची अध्यक्ष करेश मुंबईकर, सोमनाथ कोळी, माजी नगरसेवक दि.ना.पाटील, विष्णू कोळी, गंगेश कोळी, चंद्रकांत पाटील, सुरेश कोळी, मनीष बिजलानी, करणानी, सुजित कोळी, कुंदन म्हात्रे, ज्योती पाटील, श्याम कोळी, संजय कोळी तसेच बेलापूर विभागाचे कार्यकारी अभियंता वाघचौरे, उपअभियंता चौरे, बेलापूर विभागाचे विभागीय अधिकारी डॉ. अमोल पालवे व दिवाळे गावातील असंख्य नागरिक व महिला भगिनी उपस्थित होते.

### गजानन संस्थेद्वारे मराठी भाषा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

गजानन चॅरिटेबल संस्था' संचलित् मदर तेरेसा कॉन्व्हेंट स्कूल' व 'नवी मुंबई विद्यालय', घणसोली, या विद्यालयात 'मराठी भाषा दिन उत्साहात पार पडला. संस्थेचे संस्थापक डॉ. वसंतराव पाटील व मुख्याध्यापिका 'वंदना मॅडम' यांच्या हस्ते 'दीपप्रज्वलन करण्यात आले

विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा जागर आपल्या वक्तृत्वानून नृत्य कलेतून व्यक्त केला. इयत्ता ४ थीचा विदयार्थी पार्थ याने 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सूरपेटी या वादयावर वाजवून अतिशय सुंदर सादर केले.

# ऐन उन्हाळ्यात वृक्षराजींना बहर अन् मोहोर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गाव, शहर अन् रानावनातील वृक्षांना बहर..मोहोर येऊ लागतो. वृक्षांचा हा बहर मोहोर म्हणजे उन्हाळा आला अशी चाहूल असल्याचे रसायनीचे निसर्ग अभ्यासक, कवी, लेखक, चारोळीकार अनिल दाभाडे यांनी व्यक्त केले.



आंब्याचा मोहोर, कडूनिंबाचा बहर, करवंदाला आलेली फुले, पळसाची फुले, फुललेला बहावा ,पांगारा, गुलमोहर अन् शाल्मली वृक्ष तर फुलांच्या बहरांनी गाव ,शहरात, अन् रानोरानी बहरलेली दिसून येतात.

निसर्ग अभ्यासक अनिल दाभाडे यांनी पुढे असे सांगितले की, या सर्व वृक्षांना आलेला मोहोर.. बहर म्हणजे गाव, शहरात, रानोरानी जणू निसर्ग रंगल्याचे मनमोहक दृश्य दिसू लागते, पक्ष्यांसाठी ही एक पर्वणीच ठरते.

# वारी उपक्रमांची पुस्तकाचे प्रकाशन

**उरण : बातमीदार**

शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व, आदर्श शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड यांनी स्वतः शाळेत राबविलेल्या उपक्रमांवर आधारित वारी उपक्रमांची हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन उरण येथे करण्यात आले होते.

या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले एल. बी. पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी शिक्षक विद्यार्थी यांचे नाते कसे असावे, शिक्षकांनी कशा प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवावे, नवनवीन उपक्रम कसे राबवावे, लेखणी, कविता काय असते, पुस्तक प्रकाशन करताना कोणत्या अडचणी येतात या संदर्भात उपस्थितांना आपल्या भाषणातून माहिती दिली.व सर्वांनी शर्मिला गावंड यांनी लिहिलेले 'वारी उपक्रमांची' पुस्तक वाचावे असे आवाहन केले.

व्यासपीठावरील विविध उपस्थित मान्यवरांनीही शर्मिला गावंड यांच्या लिखाणाचे व दर शनिवारी शाळेत राबविणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करत शर्मिला गावंड व शिक्षक महेंद्र गावंड यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे, पनवेलचे माजी गटशिक्षणाधिकारी साबळे,साहित्यिक ज्योत्स्ना रजपुते, शुभांगी पाटील, रमाकांत पाटील, कृष्णा पाटील, अनंत गावंड, सुभाष भोपी, शेखर पाटील, केपा म्हात्रे, शंकर म्हात्रे, निर्मला घरत, श्री.जाधव, प.ध.मात्रे गुरुजी, नामदेव गावंड, कलावती पाटील, मुकुंद गावंड, राजेंद्र गावंड, हरेंद्र गावंड, बळीराम पाटील, संदीप गावंड, कौशिक ठाकूर, जयदास कोळी, प्रितम वर्तक, प्रशांत कोळी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी म.का. म्हात्रे, किशोर पाटील, धीरेंद्र ठाकूर, विकास पाटील, देविदास पाटील, रमण पंडित, संगीता गावंड, श्रद्धा म्हात्रे, प्रमिला गावंड, मीनाक्षी वरसोलकर, संपदा चव्हाण, वनिता पाटील, उषा गावंड, दिशा तांडेल, समता ठाकूर आदी शिक्षक तसेच मित्र परिवारानी मेहनत घेतली.




## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : महाशिवरात्रीनिमित्त नवेदर नवगाव येथे समुद्रकिनारी बैलगाडी शर्यतीचा थरार पहावयास मिळाला.** (छाया : जितू शिगवण)

# ‘आरसीबी’च्या पराभवाची हॅट्ट्रिक

## घरच्या मैदानावर गुजरातकडून लाजिरवाणा पराभव

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला डब्ल्यूपीएल २०२५मध्ये सलग तिसरा पराभव पत्करावा लागला आहे. गुजरातच्या संघाने आरसीबीला १२५ धावांवर रोखले आणि हे लक्ष्य १६.३ षटकांत सहा गडी राखून गाठले.

गतविजेत्या आरसीबी संघाचा फॉर्म खालावताना दिसत आहे. पहिले दोन सामने जिंकून मोसमाची सुरुवात केल्यानंतर संघाने सलग तीन सामने गमावले आहेत. गुरुवारी झालेल्या सामन्यात गुजरात जायंट्सने शानदार गोलंदाजी करत आरसीबीला १२५ धावांवर रोखले. स्मृती मानधनाच्या संघाने आपल्या सर्वात कमी धावसंख्येची बरोबरी केली. आरसीबीने शेवटच्या चार षटकांत केवळ ३४ धावा केल्या आणि दोन विकेट गमावल्या. यावरून गुजरातची भेदक गोलंदाजी दिसून येते.



विजयासाठी आसुसलेल्या तळाच्या गुजरात संघाने चेंडूसह चांगली कामगिरी केली. वेगवान गोलंदाज डिआंड्रा डॉटिन (२/३१) आणि डावखुरी फिरकीपटू तनुजा कंवर (२/१६) यांनी चांगली कामगिरी केली. ॲशले गार्डनर (१/२२) आणि काशवी गौतम (१/१७) यांनी चांगली साथ दिली.

गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गुजरातने झटपट विकेट्सची रांग लावली. पॉवरप्लेमध्ये आरसीबीची धावसंख्या ३ बाद २५ अशी झाली. स्मृती मानधना २० चेंडूत १० धावा, डॅनी व्याट-हॉज चार चेंडूत चार धावा, तर एलिस पेरी चार चेंडूत खातेही न उघडता स्वस्तात बाद झाली. पेरीने मागील चार डावांत तीन अर्धशतके झळकावली होती. या वेळी मात्र ती विशेष चमक दाखवू शकली नाही.

आरसीबीकडून कनिका आहुजाने २८ चेंडूत दोन षटकार आणि एका चौकारासह ३३ धावा केल्या, तर राघवी बिश्तने १९ चेंडूत २२ धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघींनी ३७ चेंडूत ४८ धावांची भागीदारी रचली. जॉर्जिया वेरेहम २० चेंडूत नाबाद २० धावा आणि ऋचा घोष १० चेंडूत नऊ धावा यांनी २१ धावांची भागीदारी करत डावावर पुन्हा ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, पण काशवीच्या यॉर्करने घोषला बाद करत गुजरातने सामन्यात पुनरागमन केले.

गुजरातची कर्णधार ॲश्ले गार्डनर सामन्याची सामनावीर ठरली. गार्डनरने ३१ चेंडूत तीन षटकार आणि सहा चौकारांसह ५८ धावा करत मॅचविनिंग खेळी केली, तर लिचफिल्डने ३० धावा केल्या. याशिवाय बेथ मुनी आणि हेमलता अनुक्रमे १७ आणि ११ धावा करत बाद झाल्या. आरसीबीकडून रेणुका आणि जॉर्जिया यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# भारत-पाकिस्तान संघ यंदा पुन्हा भिडणार!

**दुबई : वृत्तसंस्था**

क्रिकेट विश्वातील हायव्होल्टेज लढत म्हणजे भारत-पाकिस्तान सामना. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये काहीच दिवसांपूर्वी भारत-पाकिस्तान सामना पहायला मिळाला, ज्यात भारताने शानदार विजय मिळवला. या वर्षी दोन्ही देशांमधील हायव्होल्टेज लढत पुन्हा पहायला मिळणार आहे. येत्या काही महिन्यांतच दोन्ही देशांचे क्रिकेट संघ पुन्हा एकमेकांशी भिडणार आहेत.

चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर आता या वर्षी आशिया चषक स्पर्धा होणार आहे, ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात किमान तीन सामने अपेक्षित आहेत. सध्या पाकिस्तानमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी खेळली जात आहे आणि त्यातच आशिया कप २०२५ संदर्भात ही मोठी बातमी समोर



आली आहे. ‘क्रिकबझ’च्या वृत्तानुसार आशियाई क्रिकेट परिषदेच्या बैठकीत स्पर्धेसाठी सप्टेंबरमध्ये स्पर्धा होईल अशी मान्यता देण्यात आली आहे.

रिपोर्टमध्ये दिलेल्या वृत्तानुसार आठ संघांमध्ये होणारी ही स्पर्धा सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून चौथ्या आठवड्यादरम्यान खेळवली जाणार आहे. यादरम्यान टीम इंडिया आणि पाकिस्तान यांच्यात सामनाही होणार आहे.

२०२६मध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर या वेळचा आशिया चषकही याच फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे. या दरम्यान, सर्व आठ संघ दोन गटात विभागले जातील आणि अपेक्षेप्रमाणे भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असतील. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात गट टप्प्यात एक सामना नक्कीच खेळवला जाईल. जर दोन्ही संघ पुढील फेरीसाठी पात्र ठरले, तर पुढेही ते एकमेकांसमोर येऊ शकतात.

या स्पर्धेचे यजमानपद भारताकडे असल्याचे सांगण्यात येते. असे असले तरीही भारत-पाकिस्तान सामने श्रीलंका किंवा दुबईत खेळवले जातील, अशी शक्यता आहे. असे असले तरी हे सामने चाहत्यांसाठी एक पर्वणी असेल.

# नाशिक शहर, परभणी संघ नवे जेते; पिंपरी चिंचवड दोन्ही गटात उपविजेते

**मनमाड : प्रतिनिधी**

यजमान नाशिक शहर, परभणी संघांनी ३५व्या किशोर किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे किशोरी व किशोर गटाचे विजेतेपद पटकावले. पिंपरी चिंचवड संघ दोन्ही गटात उपविजेता ठरला.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशच्या विद्यमाने मनमाड नाशिक येथील स्व. माणकचंद ललवाणी इस्टेट (हेलिपॅड) मैदानातील मॅट वर सुरू असलेल्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात यजमान नाशिक शहरने चुरशीच्या लढतीत गतविजेत्या पिंपरी चिंचवडचा कडवा प्रतिकार ४३-३८ असा मोडून काढत स्व. सौ. राजश्री चंदन पांडे फिरता चषक व आमदार सुहास (अण्णा) कांदे कायमस्वरूपी चषक आपल्या नावे केला. शिवाय यजमान नाशिक शहर संघाला पाच लाख रुपये पारितोषिक बहाल करण्यात आले.

सुरुवात झोकात करणाऱ्या नाशिकला पिंपरी चिंचवडच्या शिलकी



तीन गड्यात गुण न घेता आल्याने नाशिकने आपल्या अंगावर लोण घेतला. मध्यंतराला पिंपरी चिंचवडकडे २०-१९ अशी आघाडी होती. हळूहळू ती वाढत गेली, पण विश्रांतीनंतर सातव्या मिनिटाला लोण देत नाशिकने ३३-३० अशी आघाडी घेतली. येथून त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

### किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

स्थानिक कबड्डीरसिकांच्या पाठिंब्यावर शेवटच्या मिनिटात आणखी एक लोण देत विजेतेपदावरील आपला दावा पक्का केला. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात अखेर नाशिकने बाजी मारत पहिल्यांदाच किशोरी गटाचे जेतेपद मिळविण्याचा मान पटकाविला. बिंदिशा सोनाराच्या तुफानी खेळाला या विजयाचे खरे श्रेय जाते. तिला यात ईशा दारोळेची चढाईत, तर हेतल हिरे, भुवनेश्वरी उर्दळ यांची पकडीची भक्कम साथ लाभली. पिंपरी चिंचवडच्या सोनाक्षी वाबळे, समृद्धी लांडगे, सिद्धी लांडे यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात कोठे दिसलाच नाही.

परभणीने किशोर गटाच्या अंतिम सामन्यात पिंपरी चिंचवडचा ४४-२४ असा एकतर्फी पराभव करीत स्व.नारायण नागो पाटील फिरता चषक व आमदार सुहास (अण्णा) कांदे कायमस्वरूपी चषक आपल्या नावे केला. झंझावाती सुरुवात करीत सुरुवातीला दोन लोण देत परभणीने पूर्वार्धात २६-१२ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात तोच जोश कायम राखत आणखी एक लोण देत सामना सहज खिशात टाकला. आर्यन पवार, किशोर जगताप यांच्या तुफानी चढाया, त्याला सोमेश्वर खोसे याची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे हा विजय सोपा गेला.

# यंदाचा आयपीएल हंगाम धोनीसाठी शेवटचा?

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय संघाची माजी आणि यशस्वी कर्णधार महेंद्रसिंह धोनी हा नेहमीच आश्चर्यकारक निर्णयाने चाहत्यांना थक्क करताना पहायला मिळाले आहे. क्रिकेटच्या मैदानात कॅप्टन्सी करताना खेळलेला त्याचा डाव असो वा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय त्याने चाहत्यांना वेळोवेळी आश्चर्याचा धक्का दिला आहे. आता त्याने यंदाचा आयपीएल हंगाम त्याचा शेवटचा असल्याचे संकेत दिले आहेत.

धोनी २०२५च्या हंगामात अनकॅप्ड खेळाडूच्या रूपात तो मैदानात उतरणार आहे. आगामी हंगामासाठी धोनी चेन्नईच्या ताफ्यात दाखल झाला, त्या वेळी त्याने जो टी-शर्ट घातला होता त्यावर लिहिलेल्या कोड लँगवेजमधून त्याने निवृत्तीचे संकेत दिल्याची चर्चा रंगत आहे.

धोनीचा टी-शर्टमधील फोटो




पाहिल्यावर फक्त छोट्या छोट्या चौकोनांची डिझाइन आहे, पण ती डिझाइन नाही तर मोर्स कोड भाषेतील त्या तीन ओळींचा मजकूर त्यात लिहिलेला आहे. धोनीच्या मोर्स कोड मेसेजमधील पहिल्या ओळीचा अर्थ वन, दुसऱ्या ओळीत लास्ट अन् तिसऱ्या ओळीचा अर्थ टाइम असा होता. याचाच अर्थ धोनीच्या टी शर्टवर जी डिझाइनसारखी दिसते त्या कोडिंगचा अर्थ वन लास्ट टाइम असा होता. त्यामुळेच धोनीने यंदाचा हंगाम शेवटचा असल्याचे संकेत दिलेत का? अशी चर्चा सुरू आहे.

# न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात कर्णधार रोहित घेणार विश्रांती?

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे, पण त्यापूर्वी संघाला अखेरचा गट सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळायचा आहे. या सामन्यासाठी टीम इंडियाने तयारी सुरू केली आहे, मात्र भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि उपकर्णधार शुबमन गिल सराव करताना दिसले नाहीत.

दुबईमध्ये भारतीय संघाने आयसीसी अकादमीमध्ये तीन तास सराव केला, परंतु यादरम्यान कर्णधार रोहित थोडा वेळही नेटवर सरावासाठी आला नाही. रोहित सरावाला का आला नाही याबाबत अधिकृत वक्तव्य आले नसले तरी सध्या तो हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरत असल्याचे मानले जात आहे.

रोहित शर्माला २३ फेब्रुवारीला पाकिस्तानविरुद्ध सामन्यात हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीचा त्रास झाला होता. या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना सीमारेषेजवळ जाणारा चेंडू थांबवण्यासाठी रोहित धाव घेत गेला. या दरम्यान त्याच्या हॅमस्ट्रिंगमध्ये त्याला त्रास जाणवला. पाकिस्तानच्या डावात तो काही काळ मैदानाबाहेरही गेला, पण नंतर मैदानात परतला.

### आजारी शुबमनही सरावाला मुकला

‘क्रिकबझ’च्या वृत्तानुसार या सराव सत्रादरम्यान रोहित संघासह तिथे उपस्थित होता, परंतु तो बाहेरून आपल्या संघातील खेळाडूंना फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षणाचा सराव करताना पाहत होता. २ मार्चपूर्वी त्याला कोणतीही अडचण येऊ नये म्हणून रोहित त्याच्या दुखापतीबाबत काळजी घेत असल्याचे मानले जात आहे. याशिवाय भारताला यानंतर उपांत्य फेरी खेळायची आहे आणि जर उपांत्य फेरीत भारत जिंकला तर त्यांना अंतिम फेरीतही खेळायचे आहे. त्यामुळे रोहितला न्यूझीलंडविरुद्ध विश्रांती दिली तरी फारसा फरक पडणार नाही.


रोहितबाबत संघ व्यवस्थापन कोणतीही जोखीम पत्करणार नाही आणि जर त्याला विश्रांती मिळाली तर तो दुखापतीतून लवकर बरा होऊ शकतो. तिसऱ्या सामन्यासाठी शर्मा संघात नसल्यास ऋषभ पंत किंवा वॉशिंग्टन सुंदर यांना प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी दिली जाईल.

दुसरीकडे शुबमन गिल आजारी आहे आणि त्यामुळे तो सरावाला येऊ शकला नाही, पण २ मार्चला होणाऱ्या सामन्यापूर्वी तो तंदुरुस्त होईल, अशी अपेक्षा आहे.





पनवेल : आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ’संदीप वैभव... आणि कविता’ ही वैभव जोशी व संदीप खरे यांच्या स्वरचित कवितांची नवी मैफिल रंगली. या वेळी उपस्थित मान्यवर व श्रोते.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com